बुधवार, १५ फेब्रुवारी २०२३
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१७२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 15 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-172 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

## बीबीसीवरील छापेमारी आणीबाणीचे द्योतक

### काँग्रेसचा मोदी सरकारवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : नरेंद्र मोदी हे हुकूमशाहीपद्धतीने काम करत असून देशात लोकशाही व्यवस्था, संविधान सर्व काही धाब्यावर बसवले आहे. सरकारच्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांवर कारवाई करुन तो आवाज दडपण्याचे काम केले जाते. बीबीसीच्या दिल्ली व मुंबईतील कार्यालयावर आयकर विभागाचे छापे हे त्याचाच भाग आहे. बीबीसीने गुजरात दंगलीसंदर्भात एक डॉक्युमेंटरी प्रसारित केली होती, त्याचा राग धरूनच ही छापेमारी केली असून देशात अघोषीत आणीबाणी अल्याचेच हे द्योतक आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.**

यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, जगात भारताला शरमेने मान खाली घालावयास लावणाऱ्या गुजरात दंगलीसंदर्भात बीबीसीने काही दिवसांपूर्वी एक डॉक्युमेंटरी प्रसारित केली होती. ही डॉक्युमेंटरी भारतात दाखवू नये यासाठी मोदी सरकारने तात्काळ त्यावर बंदी घातली. बंदी घातली असतानाही काही ठिकाणी ही डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली. बीबीसीच्या या डॉक्युमेंटरमुळेच मोदी सरकारचे पित्त खवळले व त्यांच्या आवडत्या अस्त्रातील आयकर विभागाचे छापे टाकून बीबीसीला गप्प करण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारच्या विरोधात बोलल्यास त्याच्यावर ईडी, सीबीआय अथवा आयकर विभागाच्या माध्यमातून कारवाई करून गप्प करण्याचा प्रयत्न केला जातो.

कोरोनाकाळात दैनिक भास्कर वर्तमानपत्राने मोदी सरकारच्या कारभाराचा पंचनामा केला होता. गंगा नदीत मृतदेह तरंगत असतानाच्या बातम्याही प्रकाशित केल्या होत्या. कोरोना काळात मोदी सरकारला उघडे पाडण्याचे काम दैनिक भास्करने केले आणि त्यानंतर काही दिवसातच दैनिक भास्करच्या कार्यालयांवर आयकर विभागाचे छापे टाकण्यात आले. मोदी सरकारच्या विरोधात ज्यांनी बातम्या दाखवण्याचा प्रयत्न केला त्या संपादकाला घरी पाठवण्यात आल्याची अनेक उदाहरणे आहेत. क्षुल्लक कारणावरून पत्रकारांना जेलमध्ये डांबण्यात आले. लोकशाहीचा हा चौथा स्तंभही मोदी सरकारच्या दबावाखाली आहे. मोदी राज्यात प्रसार माध्यमांना स्वातंत्र्य आहे असे भाजपाचे काही वरिष्ठ नेते सांगत असतात पण त्यात तथ्य नसून घाबरलेल्या हुकूमशाहने बीबीसीचा आवाज बंद करण्यासाठीच आयकर विभागाचे छापे टाकले, असेही लोंढे म्हणाले.

#### काँग्रेस पक्ष चीन, बीबीसी तसेच दहशतवाद्यांच्या बाजूने का उभा राहतो : भाजप

बीबीसीच्या दिल्लीमधील कार्यालयावर प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली . या अधिकाऱ्यांकडून बीबीसी कार्यालयात सर्वेक्षण केले जात आहे . या करावाईनंतर देशात एकच खळबळ उडाली असून काँग्रेसने मोदी सरकारवर सडकून टीका केली आहे . प्राप्तिकर विभागाची ही कारवाई म्हणजे अघोषित आणीबाणी आहे, असे काँग्रेसने म्हटले आहे . दरम्यान, याच कारवाईवर भाजपाने प्रतिक्रिया दिली असून बीबीसी तसेच काँग्रेसवर टीका केली आहे . प्राप्तिकर विभागाच्या कारवाईनंतर भाजपाचे प्रवक्ते गौरव भाटीया यांनी दिल्लीमध्ये पत्रकार परिषद घेतली . "प्राप्तिकर विभागाने कायद्याचे पालन करूनच बीबीसीच्या कार्यालयावर छापेमारी केली आहे . आज मोदी यांच्या नेतृत्वात भारताची चांगली प्रगती होत आहे . मात्र काही लोकांना हे आवडत नाही . बीबीसीला भारतात पत्रकारिता करण्याचा पूर्ण अधिकार आहे . भारतातील कायद्यांचे पालन करून ते त्यांची पत्रकारिता करू शकतात, असे गौरव भाटीया म्हणाले . इंदिरा गांधी यांनीदेखील बीबीसीवर बंदी घातली होती, याची आठवण काँग्रेसने ठेवली पाहिजे . भारतात प्रत्येक संस्थेला कायद्याचे पालन करून काम करण्याची संधी दिली जाते . काँग्रेस चीन, बीबीसी, दहशतवाद्यांच्या बाजूने का उभा राहतो, अशी टीका भाजपाने केली .

## पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व दै.मराठवाडा साथीच्या वतीने मागील 3 वर्षांपासून देण्यात येणाऱ्या पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार - 2023 ची घोषणा निवड समितीने केली आहे. यंदा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारांसोबतच 'पत्रकारिता जीवन गौरव' पुरस्कार व जनसंपर्कात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जनसंपर्क अधिकाऱ्यांना 'कार्यगौरव' पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक विभागातून पुरस्कार देण्यात येणार आहेत. लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत औरंगाबादेत या पुरस्काराचे वितरण करण्यात येईल, अशी माहिती राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांनी दिली.**



दयानंद माने




चंदन शिरवाळे



पवन देशपांडे



तानाजी पाटील



शिवरतन मुंदडा



संजय पाटील



ज्ञानेश्वर आर्दड


आधुनिक केसरी न्यूज

यंदाच्या पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी निवड समितीने दैनिक सकाळ मराठवाडा आवृत्तीचे कार्यकारी संपादक दयानंद माने, मुंबईतील दैनिक पुढारीचे सीनियर स्पेशल करस्पॉन्डन्स चंदन शिरवाळे, दैनिक लोकमतचे सहायक संपादक पवन देशपांडे, युनिसेफ महाराष्ट्रचे राज्य सल्लागार तानाजी दा. पाटील यांची तर 'पत्रकारिता जीवन गौरव' पुरस्कारासाठी दैनिक आनंद नगरीचे संस्थापक संपादक शिवरतन मुंदडा व 'कार्यगौरव' पुरस्कासाठी छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे जनसंपर्क अधिकारी संजय पाटील, महावितरणचे जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांची निवड करण्यात आली आहे. राज्यातील सर्वच विभागातून मोठ्या प्रमाणात पुरस्कारासाठी प्रवेशिका आल्या होत्या. निवड समितीने पुरस्कारांसाठी आलेल्या साहित्यांचे परीक्षण करून विजेत्यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली.

### विभागीय पुरस्कार प्राप्त मान्यवर

**मराठवाडा विभाग :** बाबा देशमाने (दै. रिपोर्ताज, संपादक, बीड),चंद्रकांत तारू (दै. सकाळ, पैठण तालुका प्रतिनिधी), सचिन बडे (लोकशाही न्यूज चॅनल, औरंगाबाद), प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये (मुक्त पत्रकार, परभणी), आनंद इंदानी (दै. सकाळ, बदनापूर तालुका प्रतिनिधी), सचिन कोरडे (दै. आधुनिक केसरी, उस्मानाबाद जिल्हा प्रतिनिधी), संग्राम वाघमारे (दै. पुढारी, चालकूर तालुका प्रतिनिधी), गोकुळसिंग राजपूत (दै. आनंद नगरी, सोयगाव तालुका प्रतिनिधी), शकील खलिफा (दै. देशोन्नती, पैठण तालुका प्रतिनिधी), गोकुळ लांडे (दै. मराठवाडा साथी, गंगापूर प्रतिनिधी), संदीप मानकर (दै. आधुनिक केसरी, सिल्लोड तालुका प्रतिनिधी), सुरेश वायभट (पैठण तालुका प्रतिनिधी), प्रा. बिभीषण चाटे, (दै. संकेत, बीड), प्रा. बाळासाहेब बोराडे (दै. आधुनिक केसरी, जालना जिल्हा प्रतिनिधी) **विदर्भ विभाग :** प्रमोद पाणबुडे (दै. साहसिक, वर्धा), एकनाथ चौधरी (दै. महाराष्ट्र टाईम्स, वर्धा प्रतिनिधी), **नाशिक विभाग :** किरणकुमार आवारे (दै. लोकनामा, निफाड तालुका प्रतिनिधी), बंडू खडांगळे (दै. आधुनिक केसरी, दिंडोरी तालुका प्रतिनिधी), मनोहर बोचरे (दै. सकाळ, देवगाव प्रतिनिधी), **पश्चिम महाराष्ट्र विभाग :** श्रीकांत चौरे (दै. मराठवाडा साथी, पारनेर तालुका प्रतिनिधी), नवनाथ खिल्लारे (दै. नवराष्ट्र, पंढरपूर प्रतिनिधी), अशोक सूर्यवंशी (दै. मराठवाडा साथी, मिरजगाव प्रतिनिधी), नरहरी शहाणे (दै. मराठवाडा साथी, पाथ्रडी तालुका प्रतिनिधी), अजय नजन (दै. मराठवाडा साथी, शेवगाव तालुका प्रतिनिधी), किसन पवार (दै. मराठवाडा साथी, कोपरगाव तालुका प्रतिनिधी) **कोकण विभाग** : सचिन दामोदर कांबळे (टाईम्स् नाऊ न्यूज चॅनल, रत्नागिरी), विनोद पवार (दै. पुढारी, मंडणगड प्रतिनिधी), **अमरावती विभाग :** गुलाबराव इंगळे (दै. सकाळ, जळगाव जामोद, तालुका प्रतिनिधी), सागर झनके (दै. आधुनिक केसरी, जळगाव जामोद तालुका प्रतिनिधी), अमोल गावंडे (दै. निर्भीड स्वराज संपादक, खामगाव), किरण डोंगरदिवे ( मुक्त पत्रकार).






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तर दुसऱ्या एका अवीट गोडीच्या भक्तिगीतात श्रीरामाला जागवताना, ' उठी श्रीरामा, पहाट झाली, पूर्वदिशा उजळली, उभी घेऊनी कलश दुधाचा कौसल्या माऊली ..' त्याच गाण्यात पुढे ' चराचराला जिंकून घेण्या अरुणप्रभा उगवली.. ' असे शब्द आहेत. खरोखर सूर्योदय झाला की त्याची प्रभा, प्रकाश जणू चराचर जिंकून घेतो. चराचरात चैतन्य आणतो. धरतीवरच निद्रिस्त जीवन जागृत होतं . फुलं उमलतात, पक्षी गाऊ लागतात. देवळातल्या घंटा निनादू लागतात. काही काळापूर्वी सगळीकडे पसरलेलं अंधाराचं साम्राज्य कुठे नाहीस होत ते कळत नाही. ' फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश..' दरीखोऱ्यात मग सगळीकडे प्रकाशच प्रकाश भरून राहतो. आणि सगळ्यात महत्त्वाचं काय असेल तर ते म्हणजे तो सोबत येतांना नव्या दिवसाबरोबर नव्या आशा घेऊन येतो. नव्या आशा, नव्या दिशा आणि जीवनाचे नवे गाणे. वसंतराव देशपांडेंनी गायलेलं ' तेजोनिधी लोहगोल, भास्कर हे गगनराज..' हे गाणं मनाला स्पर्शून जातं . कट्यार काळजात घुसली या नाटकातलं हे पद पुरुषोत्तम दारव्हेकरांनी लिहिलं आणि त्याला संगीतसाज चढवला आहे जितेंद्र अभिषेकी बुवांनी. ललत पंचम रागातील हे गीत कधीही ऐकलं तरी आनंद देणारं . हा तेजोनिधी एकदा आकाशात प्रकटला की अवघे भुवन म्हणजे जग त्याच्या दिव्य स्पर्शाने झगमगून जातं. आपण भारतीय किती भाग्यवान आहोत, याची तुम्हाला कदाचित कल्पना नसेल. जगातील अनेक देशात फार कमी मिळणारा सूर्यप्रकाश आमच्या देशात जवळपास बारा महिने मुबलक उपलब्ध आहे. हे आमचे केवढे भाग्य आहे. आणि आता तर उन्हाळा सुरु झाला आहे. आता आमचा देश कोरोनासारख्या संकटाला तोंड देत आहे. ही राष्ट्रीय आपत्ती आहे. जागतिक आपत्ती आहे. **क्रमशः**






# ।। दास-वाणी ।।

आधुनिक केसरी

जो सृष्टीनिर्माणकर्ता ।
तो ये सृष्टीपूर्वी होता ।
मग हे तयाची सत्ता ।
निर्माण जाली ।।
कुल्लाळ पात्रापूर्वी आहे ।
पात्रे काही कुल्लाळ नव्हे ।
तैसा देव पूर्वींच आहे ।
पाषाण नव्हे सर्वथा ।।
।।जय जय रघुवीर समर्थ ।।
दासबोध : ०८/०१/३०-३१
ज्याने ही सृष्टी आणि अनंत ब्रह्मांडे निर्माण केली
तो निर्माता परमेश्वर आधीपासूनच अस्तित्वात होता.
सृष्टीवर त्याचीच सत्ता किंवा नियमन हे
उत्पती नंतर स्थापित झाले.
हा निर्माता म्हणजे ' निमित्त कारण '.
तयार होणारे उत्पादन म्हणजे निर्मिती हे ' कार्य '.
कारण आधी अस्तित्वात असते.
म्हणूनच कार्य घडते.
हा ' कार्यकारण भाव '.
जसे की कुल्लाळ म्हणजे कुंभार हा आधी असतोच.
मडके त्याच्या हातून नंतर घडवले जाते. हे कार्य.
तसाच कर्ता निर्गुण देव आधीच असतो.
तो पृथ्वी घडवतो.
पृथ्वीवर पाषाण असतात.
त्याची आपण मूर्ती बनवतो.
हे ईश्वराचे सगुण रूप.
त्याची मनोभावे नवविधा भक्ती केल्यानंतरच
सगुणाचेनि आधारे ।
निर्गुण पाविजेनि निर्धारे ।
ही स्थिती साधकाला प्राप्त होते.
मात्र त्यासाठी आधी संतांच्या मार्गदर्शनाखाली
सार असार विवेक मात्र करावा लागतो.
हेच खरे देवदर्शन !



आधुनिक केसरी

**तुझ्याशी जुळली | नाळ देवा ||**
भेटता विठ्ठला | आनंद मावेना ||
निर्गुण सगुणा | भेट झाली ||१||
आता भेद कैसा | उरला न मनी ||
हाच चक्रपाणी | वेष्णवांचा.||२||
अनंत जन्माच्या | पुण्याईचे फळ ||
नाम सर्व काळ | मुखी तुझे ||३||
मावळला स्वार्थ | मी पण गळाले ||
आता तेजाळले | ज्ञानदिप ||४||
मोह माया सारी | जळोनिया गेली ||
तुझ्याशी जुळली | नाळ देवा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**केवळ धावू नकोस आणि केवळ विसावा देखील घेऊ नकोस. विसावा घेण्याचा कंटाळा आला म्हणूनही धावू नकोस तर दिशा, लक्ष्य सुनिश्चित करून धाव.**

---------------------------

**स्थिरतेने आणि तत्परतेने कार्य करीत राहणे सोपे नाही पण यशाचे ते गमक असते हे विसरू नकोस.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**धर्माधर्महिं मनहिं है, स्वर्ग नर्क मन जान ।**
**बद्ध मुक्त भ्रम मनहिं है, मनहिं शत्रु अज्ञान**
**।।१३७।। (स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)**
**०६/०६/१३७ मूळ भाष्याचा मराठी अनुवादः**


मन हे धर्म तथा अधर्माचे कारण आहे. स्वर्ग आणि नरकाची प्राप्ती मनामुळे होते. मनात शुभ विचार येण्याने शुभ कर्म होते. शुभ कर्माचे फल स्वर्ग प्राप्ती आहे. मनात अशुभ भाव उदय झाल्याने मनुष्य निंदित कर्मात संलग्न होतो ज्याच्या परिणाम स्वरूप त्याला नरकयातना भोगाव्या लागतात. बंधनग्रस्त अवस्था मनाच्या अज्ञानामुळे होते. मानसिक अज्ञानापासून मुक्ती हीच आत्म्याची मुक्तावस्था आहे अर्थात मनापासून पृथक् होऊन आत्मा आपल्या चेतन रूपात स्थित होऊन परमात्म्याची उपलब्धि करून मुक्त होतो. म्हणून मन हेच अज्ञानाचे कारण आणि सर्वात प्रबळ शत्रू आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# नाम हे सत्स्वरूप आहे

आधुनिक केसरी

नाम हे रूपापेक्षा निश्चित श्रेष्ठ आहे; त्यामुळे रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. रूप हे जड आणि दृश्य असल्यामुळे उत्पत्ती, स्थिती आणि विनाश, वाढ होणे आणि घटणे, जागा व्यापणे आणि जागा बदलणे, कालमानाने फरक पडणे इत्यादि बंधने त्याला असतात; पण नाम हे दृश्याच्या पलीकडे आणि सूक्ष्म असल्यामुळे त्याला उत्पत्ती आणि विनाश, वाढ आणि घट, देशकालनिमित्ताच्या मर्यादा, इत्यादि कोणतेही विकार नाहीत. नाम हे सत्स्वरूप आहे. नाम हे रूपापेक्षा व्यापक असते. व्यापक वस्तूचे क्षेत्र मोठे असल्याने तिच्यामध्ये शक्तीदेखील अधिक असते. जिच्यामध्ये शक्ती जास्त असते ती वस्तू अधिक स्वतंत्र असते. जी वस्तू अधिक स्वतंत्र असते तिला बंधने किंवा मर्यादा कमी असतात. म्हणून नाम हे रूपापेक्षा अधिक व्यापक, अधिक शक्तिमान, अधिक स्वतंत्र आणि अधिक बंधनरहित असते. आपली ज्ञानक्रिया कशी चालते ते पाहू. आपण एका टेकडीवर उभे राहून सृष्टिसौंदर्य पाहिले. त्या पाहण्यात कोणकोणत्या क्रिया होतात पाहा. प्रथम डोळ्यांमधून प्रकाश-किरणे आत गेली. बाह्य पदार्थांचे मनुष्याला ज्ञान व्हायला इंद्रिये हे पहिले साधन आहे. इंद्रियांमधून आत आलेले संस्कार एकत्र करून मन त्यांना वस्तूस्वरूप देते. वस्तूस्वरूप तयार झाल्यावर, बुद्धी



सारासार विचार करून त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान आपल्याला करून देते. पण मनुष्याच्या बुद्धीचा व्यापार इथेच थांबत नाही. टेकडीवरून आजूबाजूला पाहात असताना झाडे, वेली, घरे, बागा, माणसे, पक्षी, पाण्याचे तलाव इ. सर्व वस्तूंचे ज्ञान झाल्यावर पुन्हा त्यांचे एकीकरण होऊन, 'ही सृष्टीची शोभा आहे' असे ज्ञान आपल्याला होते. म्हणजे अनेकांत एकत्व शोधणे हेच मानवी ज्ञानाचे लक्षण आहे. या जगामध्ये कितीतरी वैचित्र्य आढळते. नाना तऱ्हेचे दगड, नाना तऱ्हेचे किडे, नाना प्रकारचे पक्षी, प्राणी या सर्वांची नावे जरी भिन्न असली तरी त्या सर्वांमध्ये 'असणेपणाचा' गुण आहे; म्हणजे, सजीव प्राणी झाला तरी तो 'आहे', आणि निर्जीव वस्तू झाली तरी तीही 'आहे'. एवढेच काय, पण आनंदालासुद्धा 'आहेपणा'चा गुण आहे. या 'असणेपणा'च्या गुणाला 'नाम' असे म्हणतात. यालाच 'ॐकार' असे म्हणतात. 'ॐकारांतून सर्व सृष्टी उगम पावली. ॐकार हे परमात्म्याचेच स्वरूप आहे. अर्थात्, नाम म्हणजे सत् होय. म्हणूनच नाम हे सृष्टीच्या आरंभी होते, ते सध्या आहेच, आणि सृष्टीचा लय झाला तरी ते शिल्लक राहणारच. नाम म्हणजे ईश्वर होय. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. रूप हे नामाहून निराळे राहू शकत नाही. नाम हे रूपाला व्यापून पुन्हा शिल्लक उरते. **आजचे बोधवचन आहे - नाम हे शाश्वत आहे. ते पूर्वी टिकले, आता आहे, आणि आपण गेल्यावर ते राहणार आहे.**

# बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

योगामध्ये असंप्रज्ञात समाधीचे वर्णन करताना विदेह अवस्थेचेही वर्णन पहायला मिळते. यामध्ये सर्व क्रियांचा समावेश असतो. अद्वैतात वेदांच्या अभ्यासामध्ये जीवनमुक्ति मानली आहे. ब्रम्हज्ञान प्राप्त



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

झाल्यानंतर संचित व क्रियमाण भस्म होतात. प्रारब्धकर्मे तेवढी शिल्लक रहातात.ते संपल्याशिवाय हा देह सोडता येत नाही. यालाच जीवनमुक्ति म्हणतात. रामानुजाचार्यांनी मुक्त आणि नित्यमुक्त असे दोन मुक्य मानले आहेत. ते कसे जे भगवंताला शरण जाऊन त्याच्या आशिर्वादाला प्राप्त होणारे त्याची क्रूपा भोगणारे ते मुक्त व जे अखंड भगवंतापाशीच रहातात संसारात कधीच येत नाहीत ते नित्यमुक्त समजावे.
मित्रांनो आपण आता समर्थानी सांगितलेल्या मुक्त ,जीवमुक्त, विदेहमुक्त आणि नित्यमुक्त अशा चार प्रकारांचा अभ्यास आता करुया.

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

देह आधीं काय खरा । देहसंबंधपसारा ॥ बुजगावणें चोरा । रक्षणसें भासतें ॥२॥ तुका करी जागा । नको चाचपूं वाउगा ॥ आहेसि तूं आगा । अंगीं डोळे उघडी ॥३॥ विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥१॥ अइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ॥ध्रु.॥ कोणा ही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥२॥ तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ॥३॥
आम्ही जरी आस । जालों टाकोनि उदास ॥१॥
आतां कोण भय धरी । पुढें मरणाचें हरी ॥ध्रु.॥
भलते ठायीं पडों । देह तुरंगीं हा चढो ॥२॥
तुमचें तुम्हांपासीं । आम्ही आहों जैसीं तैसीं ॥३॥

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १५ फेब्रुवारी २०२३

adhunikkesari.com | Adhunik Kesari



राजस्थानी मल्टीस्टेट (कार्यक्षेत्र महाराष्ट्र–कर्नाटक)

**राजस्थानी मल्टीस्टेट**

**को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ**

बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी

संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING www.rajasthanimultistate.in | Powered by Tatkal Banking

आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य



**तात्काळ बँकिंग सुविधा**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा

* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा


# हिंदू-मुस्लीम-ब्राह्मण आणि छत्रपती शिवाजी महाराज

आधुनिक केसरी

सतरावे शतक मोठे खडतर होते. यवनांचे आक्रमणांनी महाराष्ट्र पुरता नेस्तनाबूद झाला होता. एकीकडे मुस्लीम आक्रमकांनी हिंदुना बळजबरीने धर्मांतरीत केले जात होते. ब्राह्मणेत्तर हिंदू धर्म कट्टरतेमुळे त्रस्त होते. तुकाराम महाराजांना अभंग बुडवायला लावले. धर्माचा पगडा आणि कोणत्याही गोष्टीला लोकमान्यता आवश्यक असते या न्यायाने तत्कालीन लोकांमध्ये "हिंदूधर्म रक्षक राजा" हा विश्वास दृढ होणे आवश्यक होते आणि शिवाजी महाराज त्या काळाचे अपत्य असल्याकारणाने त्यांना हिंदू धर्मावर श्रद्धा-प्रेम असणे यात वावगे ते काय? त्यामुळे त्यांनी आपल्या धर्माचे रक्षण केले असेल तेही बरोबरच आहे. याच्या उलट "इंग्रज आणि मुसलमान भूमिपुत्रांवर अत्याचार करून बळजबरीने धर्मांतर घडवून आणत होते" हे कुठेतरी थांबणे क्रमप्राप्त होते. रयतेचा छळ थांबणे आणि राजाला धर्माने मान्यता देणे गरजेचे असल्याकारणाने महाराज हिंदूधर्म रक्षक होते आणि त्यात वावगे ते काय? याचा अर्थ असा होत नाही की शिवाजी महाराज इतर सर्वच धर्मांचे द्वेष्टे होते. दुर्दैवाने शिवाजी महाराज धर्माच्या रंगाने आवश्यकतेपेक्षा जास्तच रंगविले गेले. "हिंदू धर्म रक्षक, हिंदू पात पातशहा, गोब्राह्मण प्रतिपालक, विष्णूचा-शिवाचा अवतार, भवानी मातेने तलवार दिली" अशा गडद प्रतिमा रंगवल्या गेल्या. यातून ज्यांनी त्यांनी आपले इप्सित साध्य करून घेतले, परंतु "शूर, पराक्रमी, वीर्यवान, धैर्यवान, शक्तिशाली, बलशाली, निर्णयकठोर, कुशल प्रशासक, देशभक्त, थोर मातृ-पितृ भक्त, रक्षण करता, सर्वकाळ युवकांचे प्रेरणास्थान, धर्म सहिष्णू, लढवय्या योद्धा, चारित्र्य संपन्न, चारित्र्यवान, स्त्री शक्ती आणि अब्रू रक्षणकर्ता, दृष्टा राजा, प्रेमळ राजा, कनवाळू राजा, शेतकरी प्रेमी, जीवमात्रांवर प्रेम करणारा राजा, पत्नीला सन्मान देणारा राजा, शत्रूंना क्षमा करणारा राजा, उत्कृष अर्थतज्ञ, उत्कृष्ट राजनीतिज्ञ, कुशल दर्यावर्दी, उत्तम शेतकरी, उत्कृष्ट श्रोता, वारकरी, अभंग रचना करणारा, भजन-कीर्तन ऐकणारा, पिडत-दुःखीतांचा मदतनीस" आदी महाराजांच्या संबंधाने महत्वपूर्ण गोष्टींचे प्रतिपादन होणे अत्यावश्यक होते. महाराजांच्या दैदिप्यमान सद्गुणांचा प्रचार-प्रसार होणे अपेक्षित होते. पोवाडेकार, व्याख्याते, कीर्तनकार यांनी केवळ धर्माच्या अनुषंगाने चरित्र रंगवून खरे शिवाजी महाराज लोकांसमोर आणलेच नाही. हिंदूधर्म, मुस्लीम द्वेष आणि मराठा यावर शिवाजी महाराज यशस्वी झाले असते का? तसे असते तर तत्कालीन इतरही हिंदू-मराठे सरदार का यशस्वी झाले नाही? उलट त्यांनी यवनांच्या फौजेला घाबरून त्यांचे मांडलिकत्व स्वीकारले. या उलट बरेच मुसलमान हिंदू धर्म विरोधक नव्हते. "इतिहासात मुस्लीम राज्यकर्त्यांच्या हिंदू धर्माबद्दलच्या सहिष्णू वृत्तीचे अनेक पुरावे उपलब्ध आहेत." महाराजांना जात-धर्म प्रेम महत्वाचे नसून स्वराज्य स्थापना महत्वाचे होती. वर्तमानात छत्रपती शिवाजी महाराज समजून घेतांना आणि त्यांच्या चरित्र-कार्याबद्दल मोठ्या जबाबदारीने बोलले पाहिजे. महाराजांच्या प्रतिमा आणि इतिहास राजकीय लोकांनी आवश्यकतेपेक्षा जास्तच (गैर)वापर करून घेतला. सगळ्यांचेच पुतना मावशीचे प्रेम उफाळून येत आहे!





जात-धर्म-पंथाच्या अनुषंगाने लोकांना भावनिक बनवायचे, मते घ्यायची आणि पाच वर्षे रयत वाऱ्यावर! देशातील अनेक खासदार-आमदार संसदेत अथवा विधानसभेत एक शब्दही बोलत नाहीत. रस्त्याने पायी चालता येत नाही आणि साहेबांच्या वाढदिवसाच्या पोस्टर-फटाक्यांचा खर्च कोटीत! जनता डोळे असून आंधळी झाली आहे. तळी उचलणाऱ्या निर्बुद्ध लोकांचे प्रचंड पिक आले आहे! सगळीकडे दारूडेच दारुडे! मिसरूड न फुटलेला तरुण पिऊन तर्र आणि वरून शिवाजी महाराज की जय! हे चित्र भयंकर आहे! इथले राजकारण्यांनी पिढ्या बरबाद केल्यात, वर महाराजांचे नाव घेऊन मिरवताहेत. वर्धा येथे संपन्न झालेल्या मराठी साहित्य संमेलनात डॉ.अभय बंग यांनी "महाराष्ट्र नाही तर मद्यराष्ट्र!" असा राज्याचा उल्लेख करून सर्वांनाच विचारप्रवण केले आहे! पण लक्षात कोण घेतो? सत्ता, पैसा, जात, धर्म याचा धुमाकूळ सुरूच आहे! सर्वांना माझी कळकळीची विनंती आहे, आपण वेळीच सावध होऊन यावर नियंत्रण आणावे लागेल! यासाठी छत्रपतींच्या चरित्रातून जागृतीचे काम सर्वांनाच करावे लागेल. असे होणे म्हणजेच खरी शिवजयंती साजरी करणे होय! जय हिंद! जय शिवराय!




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये

संपर्क क्र. 9158064068




# अधिकारी संघटनेच्या सभासदांचे ऊर्जा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान : संचालक सुगत गमरे

## मराविमं अधिकारी संघटनेचे ४५ वे अधिवेशन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यात वित्त व लेखा,मानव संसाधन, माहिती व तंत्रज्ञान, औद्योगिक संबंध, दक्षता व सुरक्षा ,जनसंपर्क आणि विधी या महत्वाच्या विभागाचे सदस्य आहेत. महाराष्ट्र विद्युत मंडळ अधिकारी संघटनेची सदस्य संख्या ही या कंपन्यातील एकुण कर्मचाऱ्यांच्या तुलनेत अल्प असली तरी अधिकारी संघटनेच्या सभासदांचे ऊर्जा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान असून व्यवस्थापनात त्यांची भूमिका या कंपन्यांसाठी श्वासाचे काम करते, असे प्रतिपादन अधिवेशनाचे अध्यक्ष तथा महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी केले. अमरावती येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेच्या ४५ व्या राज्यव्यापी अधिवेशनाच्या उद्धाटनाप्रसंगी ते बोलत होते. या अधिवेशनाचे उध्दाटन अमरावतीचे विभागीय आयुक्त डॉ.दिलीप पांढरपट्टे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला महावितरणचे कार्यकारी संचालक अरविंद भादीकर, महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक भुषण कुलकर्णी, महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, अधिकारी संघटनेचे अध्यक्ष प्रविण बागुल, सरचिटणीस संजय खाडे, संघटन सचिव प्रविण काटोले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना गमरे म्हणाले की, राज्यातील उर्जा क्षेत्रातील महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या कंपन्याचे काम हे देशात सर्वोत्तम आहे. ऊर्जा क्षेत्रात पुढील काळात ५० हजार कोटीची कामे होणार आहेत. त्यातून ग्राहकाप्रती कर्मचाऱ्यांच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी प्रचंड वाढणार आहे. पदभरती मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. डॉ. पांढरपट्टे म्हणाले की, प्रत्येक कुटूंबाशी नाते असलेला विभाग म्हणजे वीज विभाग. प्रचंड कार्यक्षमतेने काम करणारा हा विभाग आहे, असे मी मानतो. परंतू नागरीकांना या विभागाच्या तांत्रिक अडचणी माहीत नसल्याने टिका सहन करूनही प्रतिकूल स्थितीत काम करून ग्राहकांच्या मनात या विभागाने विश्वास निर्माण केला आहे.

भादीकर म्हणाले की, अधिवेशनाच्या निमित्ताने अधिकाऱ्यांच्या भेटी होतात. अनेक विषयावर विचारमंथन होते. महावितरण ही शासकीय कंपनी आहे. वीज क्षेत्रात प्रचंड बदल होत असल्याने अंखंडीत व गतिमान सेवेसाठी कार्यक्षमतेने वसुली ही महावितरणची गरज आहे. कुलकर्णी म्हणाले की, महावितरण ग्राहक सेवेशी संबंधीत असल्याने, बदलत्या काळानुरूप अधिकाऱ्यांनी टेक्नोसेव्ही व्हावे. अधिकाऱ्यांच्या विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी व्यवस्थापनाकडून संपूर्ण प्रयत्न राहील, तर पॅरलल लायसन्सी, तसेच न सुटणाऱ्या प्रश्नाविरूध्द लढणे हा आमचा अधिकार आहे आणि अन्यायविरोधात लढणार असल्याचे मत संघटनेच्या अध्यक्ष प्रविण बागुल यांनी व्यक्त केले. तसेच कर्मचाऱ्यांच्या प्रश्न निकाली काढण्यात येणार असल्याचे मत पाटील यांनी व्यक्त केले.




# गहू उत्पादक चिंतेत

आधुनिक केसरी

देशातील हवामानात सातत्याने बदल होत आहे. कधी थंडी, कधी ढगाळ वातावरण तर कधी उन्हाचा कडाका जाणवत आहे. या बदलत्या हवामानाचा मोठा फटका राज्यात खरीप हंगामातील  पिकांना बसला होता. पूर, पाऊस आणि दुष्काळामुळं शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं होतं. अशातच आता रब्बी पिकांना देखील या बदलत्या वातावरणाचा फटका बसत आहे. सध्या तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळं गव्हाच्या पिकाला या वाढत्या तापमानाचा फटका बसण्याची शक्यता आहे. देशातील काही राज्यात तापमानात 10 अंश सेल्सिअसची वाढ झाली आहे. गेल्या वर्षी उष्णतेच्या लाटेमुळं गव्हाच्या उत्पादनात मोठी घट झाली होती. अशातच निर्यातीमुळे गहू आणि पिठाचे भाव वाढले आहेत. अशातच तापमानात पुन्हा वाढ होत आहे. यामुळं गहू उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खरीप हंगामात राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशसह अन्य राज्यांमध्ये शेतकऱ्यांची लाखो रुपयांची पिके उद्ध्वस्त झाली होती.आता रब्बी हंगामातील पिकांना देखील फटका बसण्याची शक्यता आहे. पिके वाचवण्यासाठी काय व्यवस्था करावी, अशी चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. फेब्रुवारी महिन्यात हवामान अधिक थंड राहते. गेल्या काही दिवसांपासून थंड असलेलं वातावरण गहू पिकासाठी योग्य असल्याचे सांगण्यात आले. मात्र, गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळं गहू उत्पादक शेतकऱ्यांचे टेन्शन वाढले आहे. वाढणारी उष्णता गव्हाच्या पिकासाठी धोकादायक आहे. वाढत्या उष्णतेमुळं गव्हाच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, झारखंडसह इतर राज्यांमध्ये तापमानात 10 अंश सेल्सिअसपर्यंतची वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी जिथे किमान तापमान 3 ते 4 अंश सेल्सिअस होते. आता ते 14 अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक तापमान झालं आहे. देशात मोठ्या प्रमाणात गव्हाची पेरणी झाली आहे. त्यामुळं गव्हाच्या उत्पादनात मोटी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मात्र, उष्णतेची लाट कायम राहिल्यास गव्हाच्या पिकाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. मागील वर्षी गव्हाच्या उत्पादनाबाबत केंद्र सरकारच्या नोंदी समोर आल्या होत्या. रशिया-युक्रेन युद्ध आणि उष्णतेची लाट हे गव्हाचे उत्पादन कमी होण्याचे प्रमुख कारण मानले जाते. उष्णतेच्या लाटेचा गव्हाच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला. 15 डिसेंबरपर्यंत देशात 180 लाख टन गहू आणि 111 लाख टन तांदूळ उपलब्ध होता. चालू हंगामात रब्बी पिकांच्या क्षेत्रात झपाट्यानं वाढ झाली आहे. 3.25 कोटी हेक्टर क्षेत्रावर पिकांची पेरणी झाली आहे. पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि राजस्थान ही देशातील प्रमुख गहू उत्पादक राज्य आहेत.

# गरिबी छुपाओं कार्यक्रम

आधुनिक केसरी



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

**देशातील सत्ता जेव्हा धर्मांध लोकांच्या हाती जाते तेव्हा लोक विकास, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य महागाई यावर  चर्चा न होता धार्मिक मुद्यांना भावनिक बनवून त्यांना अवास्तव महत्त्व दिले जाते. धार्मिक मुद्देच महत्वाचे आहेत असे भासवून बाकीच्या मुद्यावरून जाणीव पुर्वक लक्ष विचलीत करून राजकीय पोळी भाजुन घेतली जाते व जनतेला कंगाल केले जाते. जनता कंगाल होते, देश कर्जात बुडतो, मुलभुत गरजा पुर्ण न होता समस्या निर्माण होतात तरीही धर्मांध राजकारणात धर्माला महत्त्व देणाऱ्या भक्तांना याची जाणीव नसते. आणि याच मुळे भक्त आणि भक्तांचा देश कधी अधोगतीला जातो हे कळतही नाही.**

सामाजिक समस्या वाढल्या की मग मात्र सरकारची पंचायत होऊ नये म्हणून अजून काही विषय समोर आणले जातात. मागे अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारतात आणले तेव्हा गुजरात मधील झोपडपट्टी डोनाल्ड यांना दिसु नाही म्हणून चक्क झोपडपट्टी झाकण्यासाठी सरकारने भिंतच बांधली. भिंत बांधून आर्थिक गरीब व आर्थिक गरिबी लपवता आली परंतु विकासकामे करण्यासाठी यांच्या कडे कुवत नाही म्हणून माणसिक दारिद्रय मात्र यांना झाकता आले नाही. गरीबीची थट्टा करून डोनाल्ड साहेबांची यात्रा यांनी यशस्वी केली. भक्त निर्माण झाले की राजकीय भोळी भाजुन जनतेला कसे विकासासापासून सहज दुर ठेवता येते याचे अनेक उदाहरणे आहेत. आपण काही उदाहरणे जर बघितले तर आपल्या लक्षात येईल की भक्तांचा वापर फक्त राजकीय पोळी भाजण्यासाठी होतो.  कोरोना काळात सर्व उद्योगधंदे बंद झाले, कोरोनाची भिती दाखवुन लोकांना घरामध्ये कैद केले. कोरोना घालवण्यासाठी थाळ्या वाजवायला सांगितल्या, भक्तांनी काय काय वाजवले हे सर्व देशाने बघितले व भक्तांची माणसिक परिपक्वता दिसून आली. कोरोना काळात सर्व उद्योग डबघाईस जात असताना अदाणी फायद्यात कसा? लोकांना खायला काही मिळत नव्हते तरीही अदाणी यांना लाखों करोडो चे कर्ज मिळाले कसे? सर्व सामान्य शेतकऱ्यांना स्वतः चे पैसे भरून काढलेला पिक विमा लवकर मिळत नाही. अदाणी साठी कर्ज कसे उपलब्ध झाले? शेतकऱ्यांना शेतमाल भाव देण्यासाठी, नवीन नोकरभरती करण्यासाठी, निवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्यासाठी सरकार कडे पैसा नाही मग अदाणी साठी पैसा येतो कुठुन? अदाणी श्रीमंती दाखवताना करोडो शेतकऱ्यांना झाकले जाते. अदाणी असा कोणता व्यवसाय करत होता जो कोरोना काळातही नफ्यात होता?  भक्तांना याचे काही घेणे देणे नाही. ते कधीच स्वतंत्र मेंदुचा वापर करून तार्किक व व्यावहारीक विचार करत नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे भक्तांना सरकारचे काम विचारले तर कलम क्रमांक तिनशे सत्तर आणि मंदिर सांगतात. कलम तिनशे सत्तर हटवल्यामुळे भक्तांचा देशातील नागरिकांचा काय फायदा झाला असा प्रश्न विचारला तर उत्तर देता येत नाही. तिनशे सत्तर काय होते हे सांगता येत नाही. तरीही भक्त सांगतात चांगले काम केले. दुसरे काम म्हणजे मंदिर बांधण्याचे मुळात मंदिर बांधण्याचे काम सरकार चे नाही. तरीही सरकार म्हणते आम्ही मंदिर बांधले जर मंदिर सरकारने बांधले असले तर लोकवर्गणी सरकार दरबारी जमा झाली असेल. जर लोक वर्गणी सरकार दरबारी नसेल तर मंदिर सरकारचे कसे? लोक वर्गणीचा हिशोब सरकार देणार का? तसही  सरकारने अजून कोरोना काळातील पिएम फंड चा हिशोब दिला नाही उलट पिएम फंड माहिती अधिकारात येत नाही असे सांगितले कारण तो फंड एका खाजगी ट्रस्ट ने जमा केला होता. पिएम फंड खाजगी ट्रस्ट चा होता तर प्रधानमंत्री पिएम फंड कोणासाठी मागत होते. थोडक्यात काय तर गोरगरीब लोकांचा प्रश्न येतो तेव्हा सरकार काहीच बोलत नाही. परंतु उद्योगपतींना कर्ज गोरगरीब लोकांना डावलून दिले जाते. देशाच्या एकुण बजेट च्या एक चतुर्थांश भाग संपत्ती एका माणसाकडे जाते त्याचे दिवाळे निघते आणि देशाचे अर्थमंत्री बोलतात त्यांचा देशावर काहीच परिणाम झाला नाही आणि त्यांना नियमानुसार कर्ज दिले गेले. जर अदाणी ला लाखो करोडो रुपयाचे कर्ज नियमानुसार मिळते तर ते नियम शेतकऱ्यांना सांगा यांना लाखो करोडो रुपयांचे कर्ज नाही फक्त हजारात कर्ज पाहिजे. परंतु सरकार सर्वसामान्य लोकांना कोणत्याही प्रकारचे लाभ न देता लोकांना समस्या ग्रस्त करून सोडत आहे. जर अदाणी ला दिलेल्या कर्जाचा देशावर काहीच परिणाम झाला नाही तर आर्थिक बजेट नुसार सतरा लाख करोड रुपये कर्ज कशासाठी? विस टक्के व्याज म्हणून रक्कम बाजूला कशासाठी? पेट्रोल, गॅस महागाई कशासाठी? सिएसटी द्वारे मिळालेल्या पैशाचा खर्च कुणासाठी? तिनशे सत्तर हटवायला आणि मंदिर बांधायला देशाचे सर्व बजेट खर्च झाले? नसेल झाले तर पैसा कुठे आणि नविन कर्ज कशासाठी? अशा प्रकारचे प्रश्न जनतेने सरकार ला विचारायला पाहिजे पण शोकांतिका आहे. महागाई किती ही झाली तरी आम्हाला हेच सरकार पाहिजे म्हणणारे भक्त कमी नाहीत. का पाहिजे ते मात्र विचारू नाही.

आता मुंबई मध्ये प्रधानमंत्री यांचा दौरा झाला. प्रधानमंत्री



यांना मुंबई मधील झोपडपट्टी दिसु नये म्हणून झोपडपट्टी लपवून लोकांना त्रास दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. देशात किंवा कुठेही झोपडपट्टी वा गरीबी असणे अपराध मुळीच नाही. हळूहळू प्रामाणिक काम करून गोरगरीब लोकांच्या विकासासाठी नियोजन करून गरीबी दुर करू शकतो. परंतु गरीबी लपवून श्रीमंती दाखवणे हे मात्र अपराधी कृत्य आहे. एक तर गरीब वस्ती, रोजमजुरी केल्या शिवाय संध्याकाळची चुल पेटत नाही अशा लोकांना बाहेर फिरू द्यायचे नाही. त्यांच्या मुलांना प्रधानमंत्री येतात त्या रस्त्यावरून शाळेत जाऊ द्यायचे नाही. आणि  रोडच्या साईटला झोपडपट्टी च्या बाजूला पांढऱ्या बॅनर सदृश्य वस्तुने पुर्ण झोपडपट्टी लपवून ठेवायची आणि प्रधानमंत्री यांचे स्वागत करायचे? यालाच विकास म्हणायचा का? भक्तांना याचे काहीच वाटत नाही का? प्रत्येक गोष्टीचा इतिहास हा लिहला जात असतो. प्रत्येक गोष्टी चा अंत निश्चित असतो. आज सरकार लोकांना धार्मिक बनवून मंदीरावर बोळवण करत आहे परंतु उद्या हेच लोक शाळा, महागाई, आरोग्य, रोजगार यावर बोलणार. आज जे भक्त भावनिक होऊन सरकारचे समर्थन करत आहेत त्यांना हे कळत नाही आपल्याच पिढीचे आपण भविष्य उध्वस्त करत आहे. सध्या जी काही देशाची लुट व सर्वसामान्य लोकांवर वेगवेगळ्या प्रकारचे अन्याय होत आहेत, बेरोजगारी वाढत आहे ती भक्तांच्या घरातही आहे. स्वतः च्या घरात, समाजात बेरोजगार आहेत आणि यांना सरकारचे गर्व आहे असे बघितले तर खरंच लोकांच्या बुद्धीची किव येते. आज फक्त झोपडपट्टी झाकुन देशाचा विकास दाखवला जात आहे. उद्या गरीबच नष्ट करून श्रीमंत लोक दाखवायला हे मागेपुढे बघणार नाहीत. मुंबई झोपडपट्टी ची लाज वाटते तर विकास काम करून ती झोपडपट्टीचे बंगले करायला पाहिजे. झोपडपट्टी झाकून आणि देश विकुन कोणी महान होत नसते. आजचा दिवस उद्याचा इतिहास असतो. आणि इतिहास चांगल्या आणि वाईट गोष्टींची समिक्षा करत असतो. सरकारने झोपडपट्टी लपवली तर झोपडपट्टी मध्ये राहणारे हिंदु नव्हते का? देशात आणि राज्यात हिंदुत्वाचा ज्वलंत मुद्दा घेऊन काम करणाऱ्यांचे सरकार आहे. मग यांच्या हिंदुत्वाच्या मुद्द्यात झोपडपट्टी मधील हिंदुच्या विकासासाचे नियोजन नाही का? जर विकासाचे नियोजन आहे तर झोपडपट्टी झाकली कशासाठी? थोडे जरी लोक विकासाचे काम सरकार ने आज पर्यंत केले असते तर देशात मुलभूत सुविधा मिळाल्या असत्या आणि झोपडपट्टी शिल्लक राहील्या नसत्या. आज झोपडपट्टी ची लाज वाटली परंतु निवडणुकीच्या वेळ त्याच झोपडपट्टी मध्ये जाऊन मत माघताना लाज वाटत नसेल का? त्या झोपडपट्टी भागासाठी आजपर्यंत एकही रुपयाच्या निधीची तरतूद केली नसेल का? जिवाची बाजी लाऊन या भारत भुमी साठी हजारो तरुणांनी रक्त सांडले आणि त्या रक्ताशी बेईमानी करून देशाला लुटण्याचे काम हे मिळुन मिसळून करतात. देशाला लूटुन गोरगरीब लोकांचा पैशा खाऊन पैशाने श्रीमंत होता येईल परंतु नितीवान कसे होणार? आणि धर्म धर्म रोज बोलणारे लोक सर्व च्या सर्व निधी धर्मातीलच लोकांचा हडप करतात तेव्हा हे राजकारणी धर्म विरोधी होत नाही का? भ्रष्टाचार करणे, व्याभिचार करणे याची सवलत एखादा तरी धर्म एखाद्या तरी माणसाला देतो का? मग नितीभ्रष्ट, भ्रष्ट्राचारी तडीपार लोक जर धर्माच्या गोष्टी करत करत असतील तर त्यांचा धर्म कोणता हे अगोदर मानवतावादी दृष्टीकोणातून तपासणे आवश्यक आहे. जनतेला धर्माच्या वलयाभोवती गुंतवणूक देशाची राखरांगोळी सुरू आहे आणि हे सर्व लपवण्यासाठी गरीबी छुपाओ सारखे माणुसकीला काळीमा फासणारे उद्योग करणे सुरू आहे. तरीही आम्हाला हेच सरकार पाहिजे. गरीबी व झोपडपट्टी झाकून कार्यक्रम करणारे सरकार किती विकासासाठी तत्पर असेल यांची प्रचिती येते.

# ईपीएस-९५ पेंशनधारकांना न्याय नाही मग पुढाऱ्यांना पेंशन का ?

आधुनिक केसरी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

**सन्माननीय प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या काळात भरपूर विकास झाला आणि होत आहे यात दुमत नाही. जगात भारत तिसरी महाशक्ती म्हणून वर येत आहे यांचे मी मनापासून स्वागत करतो.परंतु भारतात गेल्या अनेक वर्षांपासून राजकीय पुढाऱ्यांना गलेलठ्ठ पगार,पेंशन व इतर भत्ते मिळत आहे यावर राज्य सरकारे व केंद्र सरकार गांभीर्याने विचार का करीत नाही? दिनांक ९ फेब्रुवारी २०२३ रोज गुरूवारला राज्यसभेतील भाषणात प्रधानमंत्री अनेक विषयांच्या चर्चेला उत्तर देत होते. यात मुख्यत्वे करून जुन्या पेन्शन योजनेला पंतप्रधानांनी विरोध दर्शविला ही बाब मान्य आहे. परंतु आजही देशातील मुठभर राजकीय पुढाऱ्यांच्या गलेलठ्ठ पेंशनमुळे देशावर व राज्यांवर करोडो रुपयांचा भुर्दंड व बोजा बसतो आहे त्याचे काय?**

यामुळेच देशात महागाई वाढत आहे, बेरोजगारी वाढत आहे त्याचे काय? असे अनेक प्रश्न सर्वसामान्यांन पुढे उपस्थित होतात. प्रधानमंत्री म्हणतात काँग्रेस व इतर विरोधी पक्षाच्या राज्य सरकारांकडून संबंधित राज्यांमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या धोरणात्मक निर्णयाला पंतप्रधान मोदी यांनी विरोध दर्शविला आहे. देशाच्या जनतेला कोणत्या पक्षाचे सरकार आहे यांच्याशी काय लेनदेन असावे.जो ही पक्षांचा उमेदवार निवडून येतो तो राज्याचा किंवा देशाचा लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी असतो व आपले प्रतिनिधित्व करीत असतो.त्यामुळे सर्वांनाच नियम सारखे असायला हवे.महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांत व केंद्र सरकार अंतर्गत देण्यात येणारी जुनी पेन्शन व ईपीएस-९५ पेंशनचा सोक्षमोक्ष लावने अत्यंत गरजेचे आहे.कारण ईपीएस-९५ पेंशन धारकांना अत्यंत तुटपुंजी पेंशन मिळत आहे. जे मेहनत करतात त्यांना कमी पेंशन व जे  फक्त पाच वर्षे देशाचं व राज्याच प्रतिनिधीत्व करतात त्यांना भरघोस पेंशन व पगार याचाही केंद्र व राज्य सरकारांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. केंद्र सरकारने किंवा राज्य सरकारने पेन्शनच्या बाबतीत राजकीय विरोध करू नये.पेंशनचा निर्णय सर्वानुमते व्हायला पाहिजे. कारण देशात व राज्यात जेव्हा राजकीय पुढाऱ्यांच्या पेंशन किंवा पगार वाढीचा जेव्हा विचार केला जातो तेव्हा पक्ष-विपक्ष एकत्र येतात व पगार वाढ किंवा पेंशन वाढीला ताबडतोब मंजूर देतात.परंतु जुनी पेन्शन धारक असो वा ईपीएस-९५ पेंशन धारक असो त्याला आपल्या मागणीसाठी संघर्ष करावा लागतो. त्यातही मोठ्या प्रमाणात आपल्याला राजकीय डावपेच पहायला मिळतो.जो पाच वर्षे लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी म्हणून रहातो त्याला कोणतीही मागणी न करता भरघोस पेंशन मिळते आणि जे आपल्या हक्काची पेंशन मागतात त्यांच्याबद्दल केंद्र व राज्य सरकारला शंभर वेळा विचार करावा लागतो ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. देशातील राज्य सरकार असो वा केंद्र सरकार यांनी सर्वप्रथम राजकीय पुढाऱ्यांना मिळत असलेल्या सुविधा व पेंशन यावर  सर्वप्रथम गांभीर्याने विचार करायला हवा व त्यांना सरकारकडुन ज्या सुविधा किंवा पेंशन मिळत आहे  त्या




योग्य आहे की अयोग्य याचाही विचार करने अत्यंत गरजेचे आहे. यानंतरच देशातील राज्याची जुनी पेन्शन किंवा केंद्राच्या अंतर्गत दिली जाणारी तुटपुंजी ईपीएस-९५  पेंशन योग्य की अयोग्य हे केंद्र व राज्य सरकारांनी ठरवावे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शहराकडे धाव घेतलेल्या लोकांची उपेक्षा



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याच्या इराद्याने गाव सोडून लोक शहराच्या दिशेने धाव घेतात. इथे त्यांचे कसे तरी पोट भरते, मात्र त्यांना अनेक दुसऱ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. अलिकडेच युनेस्कोच्या रिपोर्टमध्ये यासंबंधीची आकडेवारी प्रसिद्ध झाली आहे. शहरात उपेक्षित जीवन जगणाऱ्या या गरीब लोकांची सर्व तऱ्हेची परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने पावले उचलण्याची आवश्यकता अधोरेखित होते. गावात घरातल्या लोकांची संख्या मोठी. राबराबूनही दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असते. गावात रोजगार नसतो. त्यामुळे त्यांची आर्थिक कुचंबना तर होतेच होते शिवाय त्यांना सामाजिक, शैक्षणिक समस्यांनादेखील तोंड द्यावे लागते.**

कलाकौशल्य पूर्ण क्षमतेने अवगत नसतात. शेवटी ही मंडळी पोटापाण्यासाठी शहराकडे धाव घेतात. शेवटी त्यांना शहरात पोटापाण्याची सोय होते, हे अगोदर शहराचा रस्ता धरलेल्या गाववाल्यांमुळे कळलेलं असतं. असे असले तरी शहरात त्याचं स्वागत होत नाही, उलट त्याची उपेक्षा होते. तो कसा तरी पोटाचा प्रश्न मिटवतो. राहण्याचा प्रश्न निर्माण होतो. मग इथून त्याची फरफट सुरू राहते. झोपडपट्टी हा एक आधार त्यांना मिळत असला तरी यासाठीही त्याला नाना उपद्व्याप करावे लागतात. याचा अर्थ शहराकडे धाव घेणाऱ्यांची संख्या अशा उपेक्षित जीवनामुळे कमी झालेली नाही. उलट त्यात भयानक वाढ होत आहे. गावाकडून आलेल्या या माणसांचे शहरावर अनेक उपकार असतात. अनेक न करता येण्याजोग्या कामांचा निपटारा ही मंडळी पोटापाण्यासाठी करत असतात. पण या योगदानाला सलाम केला जात नाही, त्याची अवहेलना केली जाते.

युनेस्को-युनिसेफ यांच्या अलिकडच्या रिपोर्टनुसार भारतातली शहरी लोकसंख्या 2001 मध्ये 28.6 कोटी होती. 2011 च्या जनगणनेनुसार ती 37.7 कोटी झाली आहे. असाच वेग राहिला तर हीच संख्या 2030 पर्यंत 60 कोटीवर जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. गावाकडून शहरात पोहचलेल्या लोकांची संख्या सुरुवातीला एक तृतीयांश इतकी होती, परंतु नॅशनल सॅंपल सर्वे ऑर्गनायजेशननुसार 1983 मध्ये ही संख्या शहरी लोकसंख्येच्या 31.6 इतकी होती तर 2007-08 ला ही संख्या वाढून 35 टक्के इतकी झाली आहे. या रिपोर्टमध्ये सरकारी योजना अथवा अन्य विकासात्मक कार्यक्रम गावाकडून आलेल्या लोकांचा स्वीकार करण्यास असमर्थ ठरताहेत. त्यांच्या उपस्थितीची गणना योजना राबवताना घेतली जात नाही, असाच त्याचा अर्थ होतो. फुटपाथवर अथवा अन्य जागेवर राहणारा त्याचा अड्रेस प्रुफ करू शकत नसल्याने त्याला रेशनकार्ड मिळत नाही. त्यामुळे कुठल्या योजनांचा लाभ घेता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने सगळ्या बेघर लोकांना रेशनकार्ड देण्याचा आदेश दिला आहे तरीही त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही.

खरं सांगायचं म्हटलं तर शहराकडे रोजगारासाठी धाव घेणाऱ्या लोकांसाठी कोठल्या योजनाच नाहीत. गरिबीचे आकडे दाखवण्यासाठी सरकारी आकड्यांमध्ये गोलमाल करून काही तरी अर्धवट सूचकांक दाखवले जातात. रोज 150- 200 रुपये कमावणारा शहरी ग्रामीण माणूस पोटभर अन्न पोटात ढकलू शकत नाही. त्याला अमानवीय जीवन व्यतीत करावे लागते. त्याच्याकडे शौचालयाचीदेखील व्यवस्था नसते. त्यामुळे शहरी भागातील गरिबीची परिभाषा बदलण्याची आवश्यकता आहे. हे बदलत असताना 50 टक्के मूलभूत सुविधांचा अभाव, शाळा तसेच हाय झोन यांचा विचार व्हायला हवा. गरिबीचे मूल्यांकन करण्याची पद्धत बदलायला हवी. मुंबईसारख्या महानगरात या पद्धतीनुसार फक्त चार टक्केच गरीब दिसतात. वास्तविक 53 टक्के लोक झोपडपट्ट्यांमध्ये आणि आठ टक्के लोक फुटपाथवर राहतात. अशाचप्रकारे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानी महानगरात 30 टक्के लोक स्लम्समध्ये आणि चार टक्के लोक रस्त्यावर राहतात. तरीही सांगितलं जातं, फक्त आठ टक्के लोक दारिद्र्य रेषेच्या खालचे जीवन जगतात.



रोजगारासाठी शहरांकडे धाव घेतलेल्या लोकांसाठी योजना नसल्याने त्यांच्या आरोग्याचा, शिक्षणाचा मोठा विचका झाला आहे. त्यांना दर्जेदार अन्न तर मिळत नाहीच नाही पण भेसळीसारख्या प्रकारादेखील तोंड द्यावे लागते. रोजगार करण्यासाठी चांगल्या आणि पुरेशा अन्नाची आवश्यकता आहे, पण हे त्यांच्या नशिबी नाहीच. याचा मोठा परिणाम अशा लोकांच्या मुलांच्या शिक्षणावर होतो. त्यांना सिझननुसार रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. तेव्हा त्यांचे शिक्षण सुटते.सर्वांसाठी शिक्षण किंवा शिक्षणाचा मूलभूत अधिकार असे कायदे अस्तित्वात आले असले तरी या योजना यांच्यापासून कोसो दूर आहेत. शिक्षण चांगल्या ढंगाने मिळायला हवं, पण सतत मध्ये मध्ये शाळा सोडावी लागत असल्याने त्यात सातत्य राहत नाही. मूलभूत कौशल्य तर प्राप्त होत नाहीतच शिवाय एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जावावं लागल्याने पाठ्यक्रम आणि भाषेचा प्रश्न उभा राहतो.

शहराकडे धाव घेणाऱ्या अशा लोकांच्या मूलभूत सुविधांचा, त्यांच्या मुला-बाळांच्या शिक्षणाचा विचार करायचा झाल्यास गरिबीची परिभाषाच बदलली पाहिजे. योजनांचा पुन्हा एकदा विचार करायला हवा. शहरात आलेल्या या ग्रामीणांना मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्या गरजा, चिंतांचा विचार व्हायला हवा, असं संयुक्त राष्ट्राला वाटतं. जवाहरलाल नेहरू णेशनल अर्बन मिशन किंवा शहरी विकास योजना अशासारख्या योजनांमध्ये याचा अंतर्भाव व्हायला हवा. शिवाय पालिकांनीदेखील यांच्या समस्यांचा विचार करायला हवा. शहरी आणि शहरात आलेल्या ग्रामीण लोकांमध्ये भेदभाव करणाऱ्या योजना बदलण्याबरोबरच शहरी विकासासाठी सांस्कृतिक विविधता, सामाजिक एकता आणि मानवाधिकार आदी आधारित कार्यक्रम, उपक्रमांना संधी द्यायला हवी. त्यांना शहरी जीवनात सामावून घेतले पाहिजे. सरकारची इच्छाशक्ती यात असायलाच हवी.

# आठवणीतला पळस..!



भानुदास धोत्रे
संपर्क क्र : 7972625086

आधुनिक केसरी

**संक्रात्र सरून गेली की, तीळा तिळानं ऊन वाढू लागतं. हिवाळाभर ठान मांडून बसलेली गुलाबी थंडी वातावरणातून हळू हळू काढता पाय घेते. वातावरणातले इवले इवले बदल स्पष्टपणे जाणवू लागतात. बदलत्या वातावरणाचा परिणाम एकूणच संबंध सृष्टी आणि चराचरावर दिसून येतो. हिवाळा सरून उन्हाळा सुरु झाल्याची चिन्हे सृष्टीच्या अंग प्रत्यांगी ठळकपणे उमटू लागतात. दिवसा कडक ऊन तर रात्री कडाक्याची थंडी असेही काहीसे संमिश्र, विरोधाभासी हवामान अनुभवायला मिळते. माघ महिना संपता संपता आणि फाल्गुन महिन्याच्या प्रारंभी हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वसंत ऋतुची चाहूल लागते. सृष्टीत अमूलाग्र बदल घडायला सुरुवात होते. आंब्याला मोहोर फुटू लागतो. काही झाडांच्या पिकल्या पानांची पानगळ होऊन जाते.**



कोवळी कोवळी नवथर पालवी डोके वर काढायला सुरुवात होते. अशी ही ऋतुबदलाची ठळक लक्षणं रानोमाळी, डोंगरदाऱ्यात, धुऱ्या बंधुऱ्यावर विस्तीर्ण स्वरूपात ठान मांडून उभ्या असलेल्या पळसाकडे पाहून सहज लक्षात येतात. पळस ही वर वर पाहता सामान्य भासणारी वनस्पती. परंतु तिच्याठायी असामान्य अशी अनेक आयुर्वेदिक लक्षणे आणि गुणधर्म असतात. आयुर्वेदात पळस या वनस्पतीची महती वर्णीलेली आहेच. पळस ही वनस्पती संबंध महाराष्ट्रभर विखूरलेली दिसून येते. पळसाला ग्रामीण कृषी संसस्कृतीमध्ये अनन्य साधारण असं महत्व आहे. पोळ्याच्या आदल्या दिवशी विदर्भातील काही भागातले लोक बैलांच्या खांदे मळनिसाठी पळसाच्या पाचपानी डहाळीचा ( फान्ट्याचा ) उपयोग करतात. खरे तर पळसाच्या एका देठाला तीनच पानं असतात. त्याचाच पुरावा म्हणून की काय मराठी भाषेमध्ये पळसाच्या पानाविषयी एक म्हण सर्वपरिचित आहे. ती म्हणजे "कोठेही जा, पळसाला पाने तिनच". मग विदर्भातील ह्या लोकांना खांदेमळणीच्या दिवशी पळसाच्या झाडाला ही पाच पानं एकत्र असलेली डहाळी( फान्टा ) मिळते तरी कशी. असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. परंतु हे लोकं पाचपानी डहाळी मिळावी म्हणून शेत शिवरातील, जंगलातील अनेक पळसांची झाडे झूडुपे धुंदाळून काढतात. अनेक झाडं धुंडाळून झाल्यानंतर कुठं तरी दुर्मिळात दुर्मिळ एखादा फान्टा( डहाळी ) त्यांना सापडते आणि ते त्याचा उपयोग पोळ्याच्या पुर्वसंधेला खांदेमळणीसाठी करतात. विदर्भात जंगलही मुबलक प्रमाणात असल्यामुळं त्यांना पाच पानांची डहाळी ( फान्टा ) मिळणं थोड्याश्या सायासानं सहज शक्य होतं.

उन्हाळ्यात शेतशिवारात, गावकुसाबाहेर असलेल्या गुरांच्या गोठ्यांना शाकारण्यासाठी डिळी, झाडाच्या फांदया, पऱ्हाट्या, तुरीची काडं, तसेच आडोसा म्हणून कुड उभारण्यासाठी बांधायला दोरखंड लागतो. त्यासाठी पळसाच्या झाडाच्या मुळापासून तयार केलेल्या धाग्यांचा वापर केला जातो. त्या धाग्यांना पळसाचे तोडे असेही म्हणतात. ते अत्यंत चिवट आणि पक्के असतात. आमच्या बालपणी आम्ही वडिलांबरोबर रानात पळसाची मूळं खोदायला दूरवर जायचो. पळसाची मुळं ही जमिनीत खोलवर आणि लांब रुतलेली असत. वडील कुदळ, टिकावाच्या साह्याने खोलवर रुतून बसलेली मुळं खोदून खोदून मोकळी करीत. ती विखूरलेली मुळं आम्ही हातानं गोळा करीत असू. वडिलांना मुळं काढण्यासाठी दिवसभर मदत केली, म्हणून त्यांच्या कडून त्या मोबदल्यात आम्हाला पळसाच्या लहान कोवळ्या मुळापासून आसुडासारखा एक चाबूक तयार करून मिळायचा. माझ्याप्रमाणेच अनेक मुलांचे पालक त्यांनाही ह्याच पद्धतीणं चाबूक करून द्यायचे. शाळा सुटली की आम्ही सर्व मुलं मारोतीच्या पारापुढील मोकळ्या मैदानात जमायचो. औतावरील आसूडाचा जसा फिरवून फिरवून काडकन आवाज व्हायचा. अगदी त्याचप्रमाणे पळसाच्या मुळीपासुन तयार केलेल्या चाबूकाचाही आवाज व्हायचा. आजूबाजूलाच घरांची दाटी असल्यामुळे त्याचा आवाज खूप दूरपर्यंत घुमायचा. त्याचा प्रतिध्वनी आम्हाला ऐकायला यायचा. एका नंतर एक अशी चाबूक वाजवण्याची स्पर्धाच आम्हा मुलांमध्ये लागायची. पुढे हा शिलशीला बरेच दिवस असाच चालत राहायचा.

वसंत ऋतुची चाहूल लागताच रानातला पळस बहरायला सुरुवात होते. वाकड्या आकाराच्या काळपट लासलर रंगाच्या कळ्या फांदीभरून मोहरतात. तत्पूर्वी पिकल्या जर्जर पानांची पानझड होऊन गेलेली असते. तळपत्या उन्हाबरोबरच हळूहळू कळ्या खुलायला लागतात. बघता बघता पळस लाल-शेंद्र्या फुलांनी मोहरून जातो. दूरवरून फुललेली पळसांची अनेक झाडं एकाच वेळेला पहिली की तप्त उन्हात जंगलाला आग किंवा वणवा लागल्याचा क्षणिक भास होतो. पळसाच्या खुललेल्या रुपाला भुलून जंगली पळसमैना त्याकडे मोठया संख्येने आकर्षित होतात. फुलातील मकरंद खाण्यासाठी त्यांचा किलबिलाट चाललेला दिसून येतो. त्यांच्या ह्या मकरंद सेवनाबरोबरच सृष्टीतील पराग सिंचनाचेही कार्य आपोआप घडून येते. "एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ" हे संतवचन सार्थकी लागल्याची प्रचिती निसर्गातील अशा लहान सहान गोष्टीवरून लक्षात येते. पुढे हळुपणे होलीकोत्सव जवळ येतो. रंगपंचमीच्या दिवशी पळसाच्या फुलांचा रंग तयार करून एकमेकांच्या अंगावर उधळला जातो. तो पक्का नैसर्गिक रंग असल्यामुळे शरीरालाही कुठला अपाय होत नाही. झाला तर फायदाच. परंतु हल्ली रंगपंचमीलाही विक्षिप्त स्वरूप प्राप्त झाले आहे. लोकं बाजारात मिळणाऱ्या केमिकल रंगाचा सर्रास वापर करतात. परिणामी त्वचारोगासारख्या बिमाऱ्या होण्याचा संभव असतो. किंवा दृष्टीदोष निर्माण होण्याचीही भीती असते.

रानटी पळस फुलांच्या रंगाचा वापर करून बालपणी रंग खेळलेला आठवलं की, अजूनही रानात जाऊन पळसाची फुलं तोडून आणण्याचा मोह अनावर होतो. पण ते आता शक्य होत नाही. पळस फुलांचा सडा रानात येता जाता कुठेतरी अचानक बघण्यात येतो आणि बालपणी प्रत्यक्ष अनुभूती घेतलेला "आठवाणितला पळस" मनात जागा होतो. अशावेळी कवितेच्या काही ओळी उस्फुर्तपणे ओठावर आल्याशिवाय राहत नाहीत. त्या अशा..........

**तप्त उन्हात, तृप्त पळस**
**ऋतूकळा मांडतो**
**फाल्गुनाचे रंगदान**
**रानोमाळी सांडतो.......**

# विद्रोहाचा ज्वालामुखी: पद्मश्री नामदेव ढसाळ



अमरदिप हिवराळे
संपर्क क्र. ९९२३८३७०६०


आधुनिक केसरी

**पद्मश्री नामदेव ढसाळ यांनी १९७२ च्या काळामध्ये भारताच्या सामाजिक, राजकिय व साहित्य या महत्वपूर्ण क्षेत्रांमध्ये पदार्पण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर नितांत श्रद्धा असलेले प्रखर आंबेडकरवादी पद्मश्री नामदेव ढसाळ हे जागतिक व सामाजिक दर्जाचे मराठी विद्रोही साहित्य परंपरेतील एक क्रांतीकारी कवी व विद्रोही लेखक म्हणून ओळखण्यात येतात. दलित व दुर्बल, शोषीत, पिडीत घटकांवर होणाऱ्या अन्याया बद्दल त्यांना तीव्र चीड होती. दलितांवरील वाढत्या अन्याय-अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी दलित पँथरची ९ जुलै १९७२ रोजी स्थापना करून अनेक तरुणांना संघटीत केले, व त्या माध्यमातून अन्याय विरुद्ध लढा दिला.**

त्यांच्या लेखन शैलीने भारतीय साहित्याला संपुर्ण बदलून परिवर्तीत केले. कारण जन्माला आल्यापासून त्यांना दुःखांनी घेरले होते. जात वास्तवाच्या जहराने त्यांना मोकळा श्वास घेवू दिला नाही आणि त्यांना मानसिक स्वस्थता लाभू दिली नाही. पद्मश्री ढसाळांचे आयुष्य असे जंगला सारखे पेटत होते आणि हे आयुष्य मराठी साहित्यात आपले उग्ररुप घेतले. एकुणच त्यांनी भारतातील साहित्याला परिवर्तीत केले. आपल्या लेखनशैलीने व्यवस्थेविरुद्ध बंड केले; समाजाप्रती असलेली आत्मीयता व न्यायाच्या बाजूने दिलेला लढा हे त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्ये होते.

ते मराठी साहित्याचे विद्रोही लेखक व कवी तसेच आक्रमक पँथर म्हणून ओळखण्यात येतात. कारण संत चोखामेळा, संत तुकाराम यांच्या विद्रोहाचे हत्यार घेऊन उतरणारा विसाव्या शतकातील एक विद्रोही कवी, साहित्यिक म्हणून गणला जातो. त्यांचे लिखाण हे मानवकेंद्रीत होते. त्यांनी भारतीय मानसिकतेची भेदनिती तंतोतंत ओळखली होती आणि ते त्यावर तुटून पडले होते. त्यांच्या कविता व साहित्य कल्पना विश्वात न अडकता वास्तवदर्शी असल्याने त्यांच्या सहित्याची जगाने दखल घेतली व ढसाळांच्या बंडखोरीने साहित्य विश्वाला एक वेगळीच दिशा दिली त्यांच्या जीवनातील अनुभवाने त्यांनी या समाजाची व व्यवस्थेत असलेली विषमता उघड केली त्यांच्या साहित्याने एक व्यवस्थे विषयी असलेला रोष प्रकट केला त्यांच्या कवितांनी प्रत्येक माणसाला एक विचार करावयास भाग पाडले, सामान्य माणसाच्या वेदनेचे साहित्य प्रकट करत असताना त्यांनी अनुभव मांडला त्यांचे साहित्य हे कल्पना विश्वात रमणारे नव्हते त्यांचे साहित्य सामन्याच्या वेदना प्रकट करणारे होते त्यांच्या साहित्याने जगाला भुरळ घातली त्यांच्या कविता व साहित्यातून प्रखर आंबेडकरवाद दिसून येतो, सर्व सामान्यांच्या आयुष्याला बदलवून टाकण्याची भाषा त्यांच्या साहित्यातून दिसून येते त्यांच्या आयुष्यात बुध्दाच्या अहिंसेचे आत्यंतिक महत्व होते परंतु ती अहिंसा दुबळ्या लोकावर दबाव तंत्र वापर करणाऱ्याच्या विरोधात होती व त्यांच्या कविता व साहित्य जागतिक वाङ्मयापर्यंत पोहोचले म्हणून त्यांच्या साहित्यकृतीसाठी अनेक पुरस्कार प्रदान देण्यात आले.

पद्मश्री नामदेव ढसाळ यांची साहित्य संपदा व लेखन कार्य हे अत्यंत महत्वपुर्ण असे आहे. एक ज्वालामुखीची जन्मकथा गोलपिठा " (जून १९७२) - पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या गोलपिठा या काव्यसंग्रहात मुंबईच्या गरिबी पासून ते कामगार वर्गाच्या शोषणा पर्यंतचे विविध प्रकारचे पैलू उलगडले आहेत व अत्यंत वास्तव चित्रण मांडले आहे," गोलपिठा " (जून १९७२) - या संग्रहाला विजय तेंडूलकरांनी जी प्रस्तावना दिली आहे. ती अतिशय अभ्यासपूर्ण अशी आहे. या प्रस्तावनेतील पुढील ओळींवरून 'गोलपिठा' या शब्दाचा नेमका अर्थ आणि या संग्रहातील कवितांचा आशय नेमकेपणाने स्पष्ट होतो. तेंडुलकर म्हणतात, पांढरपेशा जगाच्या सीमा संपून पांढरपेशा हिशेबांनी 'नो मॅन्स लँड'- निर्मनुष्य प्रदेश – जेथून सुरू होतो तेथून नामदेव ढसाळ याच्या कवितेचे मुंबईतील, 'गोलपिठा' नावाने ओळखले जाणारे जग सुरू होते. हे जग आहे रात्रीच्या दिवसाचे, रिकाम्या किंवा अर्धभरल्या पोटांचे, मरणाच्या खस्तांचे, उद्याच्या चिंतांचे, शरम आणि संवेदना जळून उरणाऱ्या मनुष्यदेहांचे, असोशी वाहणाऱ्या गटरांचे, गटाराशेजारी मरणाची थंडी निवारीत पोटाशी पाय मुडपून झोपणाऱ्या तरुण रोगी देहांचे, बेकारांचे, भिकाऱ्यांचे, खिसेकापूंचे, बैराग्यांचे, दादांचे आणि भडव्यांचे; दर्ग्यांचे आणि क्रुसांचे; कुरकुरणाऱ्या पलंगालगतच्या पोपडे गेलेल्या भिंतीवरच्या देवांचे आणि राजेश खन्नांचे; गांजाच्या खाटल्याचे, त्याच खाटल्यावरल्या कोपऱ्यात झोपलेल्या गोजिरवाण्या मुलाचे. त्या मुलाला 'शरीफ' बनवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगीत जवळच्या कुंटणखान्याची रखवाली करणाऱ्या क्षयरोगी बापाचे, हिजड्यांचे, हातभट्ट्यांचे, आध्यात्मिक कव्वाल्यांच्या तबकड्यांचे आणि कोणत्याही क्षणी पाण्याच्या भावाने वाहणाऱ्या



ऊन चिकट रक्ताचे, वाफा ओकणाऱ्या पाणचट लालभडक चहाचे; स्मगलिंगचे, नागव्या चाकूंचे, अफूचे. १९४३ साली मुंबईच्या गोदी भागात एक नंगा बाबा ओरडू लागला, माझ्यामागून या, जगबुडी येणार, माझ्यामागून या. लंगडे, थोटे, भुकेकंगाल, बेकार, रोगी, भोगी जे कोणी त्याच्यामागून जिवासाठी धावले ते या भागात येऊन वाचले म्हणे. कारण गोदीत प्रचंड स्फोट झाला. नंगा बाबाने गोलपिठ्याला आणून सर्वांना वाचवले. ढसाळच्या गोलपिठ्याला. जेथे महारोगी शरीरेही किंमत देऊन रस्त्याकडेस भोगली जातात, संभोगाशेजारी अर्भके रडतात, वेश्या गिऱ्हाइकांच्या प्रतीक्षेत गळाभर प्रेमगीते गातात, जेथून कोणी जिवानिशी पळू शकत नाही, पळाले तर परत येते, तो गोलपिठा. दया-क्षमा-शांती यांचा लागता नसलेला गोलपिठा. अशा या विश्वात राहत असतांना जे भोगले, अनुभव आले, पाहिले त्याची कविता पद्मश्री ढसाळांनी गोलपिठातून जगापुढे मांडली. या काव्यसंग्रहाने मराठी साहित्याची दिशाच बदलवून टाकली. या काव्यसंग्रहात मुंबईच्या विविध प्रकारच्या जगण्याची पद्धत जगासमोर आणली आहे, यामुळे पद्मश्री नामदेव ढसाळ यांचे लेखन कार्य हे विद्रोही साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक संवादाचे प्रभावी नि उपयुक्त असे आदर्श वैचारिक लेखन निर्माण झाले आहे.

**मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले " (१९७५)** या संग्रहातील पद्मश्री ढसाळांची जी भूमिका आहे, ती राजकीय स्वरुपाची आहे. व त्यांनी स्पष्ट केलेली विषमता, शोषण, भ्रष्टाचार आणि जाती व्यवस्थे बद्दलची भूमिका लक्षणीय म्हणावी लागेल.

आमच्या इतिहासातील अपरिहार्य पात्र - प्रियदर्शिनी (२५ ऑगस्ट १९७६) - या मध्ये त्यांनी इंदिरा गांधी वर लिहिलेली दिर्घ कविता : आहे. बँकांचे राष्ट्रीयकरण, संस्थानिकांचे सामान्यीकरण अशा एका मागोमाग एक घेतलेल्या निर्णयाने समाजवादाकडे वाटचाल करणाऱ्या, पुर्व पाकिस्तानातल्या अन्यायाला विश्वभर वाचा फोडत लीलया युद्धं जिंकणार्या व्यक्तीमत्वाशी झालेली एकात्मता या दीर्घ काव्यात प्रकट झाली आहे.

**तुही यत्ता कंची ? तुही यत्ता (१९८१)** - हा पद्मश्री नामदेव ढसाळ यांचा नवा चौथा काव्यसंग्राह ५१ कवितांच्या ह्या संग्रहात ढसाळांच्या सर्वगामी प्रवासाचे विविध समृद्ध रंग प्रकट झाले आहेत. स्वतःच्या अनोख्या ढंगाने आणि शैलीने उपरोक्त संग्रह संस्मरणीय असाच झाला आहे. (तुही यत्ता कंची ? तुही यत्ता - पान क्र.७)

**खेळ (१९८३)** - यामध्ये हा सर्वात 'हटके' काव्यसंग्रह आहे आणि हा पद्मश्री ढसाळांने 'समस्त स्त्रीपुरुषांच्या कामविलासां' ना अर्पण केलाय! कवितेला न पद्मश्री ढसाळांना कुठला विषय वर्ज्य नव्हताच! यातील प्रतिमाशैली वेगळी दिसते व अत्यंत तरल आणि कल्पनेहून भिन्न अशा प्रतिमा आणि त्यासाठी कवितेमध्ये एक कुसुमाग्रज वगळता अत्यंत वाईट रोमँटिसिझमचा भ्रष्ट अवतार होता त्यालाही प्रथमच पद्मश्री ढसाळांनी उडवून लावला ही या कविता संग्रहातील वेगळी बाब कुणाही समीक्षकानं लक्षात घेतली नाही हे खेदजनकच, रोमँटिसिझम मॅच्युअर्ड आणि एक मुग्ध बाजातली कविता या कवितासंग्रहात प्रथम दिसून आली. (समग्र नामदेव ढसाळ भाग-१ पान क्र.१२)

**गांडू बगीचा (१९८७)** - यातील प्रतिमा - शैली कमालचे वेगळे पण सिद्ध करते. पद्मश्री नामदेव ढसाळ यांची ही जी काही तडफड आहे ही ढसाळांच्या कवितेत शोषित समाजाची गर्जना होती, आक्रोश होता व तो आक्रोश असह्यतेकडे न जाता एक निश्चीत पर्यायकडे, एका उत्तराकडे जाणारा दिसतो. (समग्र नामदेव ढसाळ भाग-१ पान क्र.१३) **या सत्तेत जीव रमत नाही " (६ डिसेंबर १९९५) - क्रमश :**

# अवयवदानाबाबत जागरुकता वाढविण्याची गरज



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**देहदान व अवयवदानाबाबत जागरुकता वाढत आहे. मात्र, या चळवळीने अजूनही जोर धरलेला नाही. सर्वसामान्यांच्या मनात देहदान व अवयवदानाविषयी अनेक शंका आहेत. बऱ्याच लोकांना असं वाटतं की, ते अवयव दान करणार आहेत असं हॉस्पिटलमधील डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांना समजलं तर ते त्यांना वाचवण्याचा प्रयत्नच करणार नाहीत. पण हा समज अत्यंत चुकीचा आहे. कारण प्रत्येक डॉक्टर रूग्णांचा जीव वाचवण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. ते उगाच कोणालाही मरणाच्या दारी पाठवत नाहीत.**

आपल्या शरीराला अनेक व्याधी असतात. असे असताना अवयवदान करू शकत नाही असा प्रत्येकाचा समज असतो. पण हा समज अत्यंत चुकीचा असून प्रत्येकजण अवयदान करू शकतात. वृद्ध माणसांना अवयव दान करता येत नाही असं अनेक जणांना वाटतं पण हा समज अत्यंत चुकीचा आहे. अवयव दान करण्यासाठी वयाची कोणतीही अट नाही. फक्त अवयवांचं सुदृढ असणं गरजेचं असतं. अवयव दान करण्यासाठी कोणताही खर्च येत नाही. अनेक जणांचा असा समज आहे की, अवयव दान करणासाठी फार मोठा खर्च करावा लागतो. अवयवदान केल्यानंतर कोणीही तुमचा कोणताही अवयव विकू शकत नाही. असे कोणी करत असेल तर कायद्याने त्यांना कडक शिक्षा होऊ शकते.जर एखादी व्यक्ती कोमामध्ये असेल तर ती व्यक्ती अवयवदान करू शकत नाही असा अनेक जणांचा समज असतो. एका संशोधनातून असं सिद्ध झालं आहे की, अवयवदान करणाऱ्या लोकांमध्ये सर्वात जास्त संख्या ब्रेन डेड असणाऱ्या लोकांची आहे. त्यामुळे जर ब्रेन डेड झालेली लोकं अवयव दान करू शकतात तर कोमात गेलेली लोकंही नक्कीच अवयव दान करू शकतात. अवयवदान करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीचं सेक्शुअल ओरिअंट नाही तर त्या व्यक्तिच्या शरीराचं सुदृढ असणं गरजेचं असतं. त्यामुळे एलजीबीटी कम्युनिटी असणारी लोकंही अवयव दान करू शकतात. मेंदूमृत अवयवदान म्हणजे जीवनदान. गेल्या काही वर्षात अवयवदान मोहिमेने महाराष्ट्रात चांगलाच जोर धरला होता त्याकरिता गेल्यावर्षीच केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रायलतर्फे अवयवदानामध्ये महाराष्ट्र राज्याला 'उत्कृष्ट राज्य' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. २०१९ साली सुमारे १६० मेंदूमृत अवयवदान पार पडले होते. त्यामुळे ४४५पेक्षा अधिक रुग्णांना नवीन जीवन मिळाले होते. जो आतापर्यंतचा सर्वाधिक आकडा होता. राज्याचे देशपातळीवर कौतुक करण्यात आले होते. यावर्षी म्हणजे २०२० मध्ये हा आकडा वाढण्याची शक्यता जास्त असतानाच नेमका यावर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव अख्या देशात झाला आणि या सामाजिक मोहिमेला एक प्रकारची खीळ बसली. मेंदूमृत अवयवदानामुळे अनेकांना नवीन आयुष्य मिळण्यास मदत होत असते. मार्च ते जुलै या महिन्यात केवळ २२ अवयदान राज्यात पार पडले होते, गेल्यावर्षीच्या तुलनेनं हा आकडा खूपच कमी आहे. २०२० सालातील अर्धे वर्ष संपले आहे, थोड्या प्रमाणात ही मोहीम सुरु झाली आहे. शेकडोच्या संख्येने राज्यात रुग्ण अवयव मिळण्यासाठी प्रतीक्षा यादीवर नाव नोंद करून अवयव मिळण्याची वाट बघत आहे. त्यांच्या आयुष्यात नवीन बदल घडवायचा असेल, किंवा आयुष्य सुखकर करायचे असेल तर या अवयवदान मोहिमेला बळ मिळणे गरजेचे आहे. प्रतीक्षा यादीवरील प्रत्येक रुग्ण असह्य वेदना सहन करत एक-एक दिवस व्यथित करत आहेत, त्या रुग्णाच्या वेदना आणि त्यांची परिस्थिती शब्दात मांडता येणार नाही. २०२० सालात, जानेवारी ते मार्च या तीन महिन्यात जे काही मेंदूमृत अवयवदान झालेत त्यामधून ८६ रुग्णांना नवीन आयुष्य मिळाले होते. त्यानंतर कोरोनाचा काळ सुरु झाला. त्यानंतर एप्रिल ते जुलै या चार महिन्यात जे काही मेंदूमृत अवयवदान झालेत त्यामधून २१ रुग्णांना नवीन आयुष्य मिळाले आहेत. यावरून या काळात मेंदूमृत अवयवदान किती झाले आहेत याची प्रचिती येते. ही माहिती राज्य अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्थेकडून प्राप्त झाली आहे, राज्यातील अवयवदान आणि त्या संदर्भातील सर्व गोष्टीवर देखरेख ठेवणारी म्हून संस्था काम करत असते. त्याचप्रमाणे विशेष म्हणजे, लॉकडाउनच्या या काळात १८जुलैला एका मेंदूमृत ३९ वर्षीय महिलेने हृदय, यकृत, दोन मूत्रपिंडे दान केलीत. त्यामुळे कोरोनकाळातील हे पहिले हृदय दान ठरले आहे. ही शस्त्रक्रिया नवी मुंबईतील एका खासगी रुग्णालयात पार पडली. आपल्या देशात आणि राज्यात मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा, १९९४ अंतर्गत अवयव प्रत्यारोपण केले जाते. कालांतराने या कायद्यात अधिक बदल करून २०१४ साली काही सुधारणा करण्यात आल्या. अवयवदानाबद्दल यापूर्वी भरपूर लिहिले गेले आहे. या बाबत थोडक्यात या लेखातून माहिती देण्याचा प्रयत्न करूया. आपल्याकडे



मेंदूमृत अवयवदानामध्ये हृदय, यकृत, मूत्रपिंड, स्वादुपिंड, त्वचा, डोळे, फुफ्फुसे आणि आतडे देखील दान केले जाते. या यामध्ये त्वचेचा वापर गंभीररित्या भाजलेल्या व्यक्तीमध्ये करता येतो. अन्य अवयवाचे त्या रुग्णाच्या गरजेनुसार त्या रुग्णांमध्ये प्रत्यारोपण करता येते. ज्या रुग्णांचा एखादा अवयव कायमचा निकामी होतो आणि औषधोपचारानेही बरा होत नाही. त्यावेळी त्याला अवयव प्रत्यारोपण करण्याशिवाय पर्याय नसतो. त्यावेळी त्या रुग्णाच्याच नात्यातील निरोगी व्यक्तीचा अवयव घेऊन रुग्णाच्या शरीरात त्या अवयवाचे प्रत्यारोपण केले जाते. त्याकरिता रक्तगट मॅचिंग होणे गरजेचे असते. जिवंत व्यक्ती जवळच्या नातेवाईकाला अशा पद्धतीने अवयव देऊ शकतात. फक्त मूत्रपिंड आणि यकृत याच अवयवाचे जिवंतपणी दान करता येते. या व्यतिरिक्त जे अवयव दान करता येते त्याला मेंदूमृत अवयवदान असे म्हणतात.

सगळ्यात जास्त अवयव मेंदूमृत अवयवदाना मार्फत केले जातात. एक मेंदूमृत व्यक्ती ७-८ व्यक्तींना नवीन आयुष्य देते. मेंदूमृत प्रक्रियेत रुग्णाचा मेंदू मृत स्वरूपात असून बाकीचे सर्व अवयव व्हेंटिलेटरच्या साहाय्याने कार्यरत असतात. रस्त्यांवरील अपघात, मेंदूत अतिरक्तस्राव आणि अन्य कोणत्या कारणांमुळे मेंदूचे कार्य थांबते आणि तो रुग्ण व्हेंटिलेटर असेल तर त्याच्या नातेवाईकाच्या संमतीने त्या व्यक्तीचे अवयवदान करता येते. या करीत रुग्णालयातील समुपदेशक रुग्णाच्या संबंधित नातेवाईकांशी बोलून अवयवदानासंदर्भातील सविस्तर माहिती देतो. त्या रुग्णाच्या नातेवाईकाने एकदा का समंती दिली कि मग अवयवदानाची प्रक्रियेस सुरुवात होते.

मेंदूमृत झालेल्या व्यक्तीचा जिवंत राहूनही उपयोग नसतो. त्यांचा एकदा का व्हेंटिलेटर काढला तर ती व्यक्ती काही दिवसाने मृत होते. जर एकदा का व्यक्ती मृत झाली तर त्या व्यक्तीचे कोणतेही अवयव वापरता येत नाही. त्यानंतर फार-फार तर त्वचा आणि डोळ्याचा वापर होऊ शकतो. मात्र इतर कोणतेही अवयव वापरता येत नाही. जर ही प्रक्रिया लवकर केली तर प्रत्यारोपण यशस्वी होण्याचे प्रमाण अधिक असते .आपल्या मृत्यूनंतरही हे सुंदर जग आपण नेत्रदान करून पुन्हा पाहू शकतो. तसेच इतर अवयव दान केल्यानेही आपण वेगळ्या रुपात जिवंत राहू शकतो. गेल्या काही वर्षात अशा पद्धतीने अवयव दान केल्यामुळे आज हजारो व्यक्ती त्यांचे आयुष्य व्यवस्थिपणे जगत आहेत. आपल्या राज्यात बहुतांश सर्वच अवयव प्रत्यारोपण केले जातात तसे निष्णात डॉक्टर आपल्या राज्यात असून त्याकरिता अवश्य असणारी अत्याधुनिक साधनसामुग्री असलेली रुग्णालये राज्यात आहेत, आणि गेली काही वर्षे अत्यंत यशस्वीपणे अवयव प्रत्यारोपण करत आहेत. सध्या भारतात या अवयवांव्यतिरिक्त हाताचे प्रत्यारोपणास सुरुवात झाली आहे. त्यामध्ये सध्या हळू हळू प्रगती सुरु आहे.

आपल्याकडे राज्यात अवयवांच्या नियमनाकरिता मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर अशा चार विभागीय प्रत्यारोपण समन्वय समिती कार्यरत आहेत. या समिती मार्फत ज्या रुग्णांना अवयव पाहिजे आहे त्यांचे नोंदणीकरण केले जाते. ही समिती मेंदूमृत व्यक्तीचे अवयव आणि गरजू रुग्णांमध्ये समन्वयाचे काम पाहत असते. गेल्या काही वर्षात या समित्या उत्तमरीत्या आपले काम करीत आहेत. तसेच काही रूग्णांच्या बाबतीत वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभागाची परवानगी आवश्यक असते, ती प्रकरणे त्यांच्या समंतीने पुढे जातात. या व्यतिरिक्त आपल्या राज्यात काही वर्षांपूर्वीच अवयव दाना संदर्भात राज्यस्तरावर समन्वय साधणारी, अवयदान आणि त्या संदर्भातील कामावर देखरेख करणारी राज्य अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्थेची केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रायलतर्फे स्थापना करण्यात आली आहे.

# सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान मधुबाला

आधुनिक केसरी

१४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मरलीन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९० वि जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ सालीं आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही.



अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला." मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५४ वर्ष झाले मात्र त्यांच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे.

**श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# श्री संत गजानन महाराज अदुभत दैवी शक्ती

आधुनिक केसरी

**श्री संत गजानन महाराजांची महिमा अपरंपार आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळेच त्यांना ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज असे संबोधले जाते. कारण त्यांची महिमा संपूर्ण ब्रम्हांडात प्रचलित असल्याचे दर्शविते. आज जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तर आपल्या लक्षात येईल की भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. कारण महाराष्ट्रात अनेक थोर संत,महात्मे झालेत त्यातलेच संत गजानन महाराज आहेत.**

आपल्याला गजानन महाराजांचे अनेक चमत्कार दिसून येतात. त्याचप्रमाणे संपूर्ण भारतात शांततेचे प्रतिक म्हणून शेगावचे गजानन महाराजांचे मंदिर प्रसिद्ध आहे. संत गजानन महाराज दिनांक २३ फेब्रुवारी १८७८ रोजी शेगावमध्ये तारूण्याअवस्थेत प्रगत झालेत.आज संपूर्ण भारतात श्री संत गजानन महाराजांमुळे महाराष्ट्रातील शेगाव हे गाव प्रसिध्दीस आले. साधु देविदास पातूकर यांच्या मठाबाहेर पडलेल्या उष्ट्या पत्राळीतील अन्नाचे कण वेचून खात होते व गाईगुरांकरीता पिण्यासाठी ठेवलेले पाणी पिऊन निघून गेले. ते पुढे बार्शी येथील ब्रम्हनिष्ठ श्रीगोविंद महाराज टाकळीकर यांचे शेगावी महादेवाच्या मंदिरात कीर्तन झाले. त्याप्रसंगी टाकळीकरांच्या बेफाम असलेल्या घोड्यांच्या चौपायांत श्री गजानन महाराज हे ब्राह्मानंदी निमग्न होऊन निजलेले आढळले परंतु तुफान घोडा शांत झाला. अशाप्रकारे तुफान घोड्याला गजानन महाराजांनी शांत केले.तत्काळ गोविंदमहाराजांनी संत गजानन महाराजांची योग्यता ओळखुन भक्तीभावाने पूजा केली व त्यांची महती शेगाव निवासी लोकांना सांगितली. तेव्हापासुनच संत श्री गजानन महाराजांची प्रसिद्धी झाली. यानंतर महाराजांचे अनेक चमत्कार लोकांना दिसून आले. बंकटलाल अग्रवाल यांना गजानन महाराज प्रथमच दिसले असता "गण गण गणात बोते" असे उच्चारत त्यांचे भजन नेहमीच सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांन गजानन महाराज ही अद्‌भुत शक्ती असल्याचे लक्षात आले व गण गण गणात बोते हा जाप सर्वांच्याच हृदयात बसला व गजानन महाराजांची महीमा संपूर्ण शेगावी पसरली.कारण गजानन महाराज ही दैवी शक्ती होती आणि आहे.गजानन महाराजांचे अनेक चमत्कार आपल्याला वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या रूपात पहायला मिळतात.महाराजांच्या तीर्थानेच जानराव देशमुख नावाच्या गृहस्थ मरणोन्मुख स्थितीतुन बरे झाले.अनेक भक्तांना साक्षात पांडुरंगाचे दर्शन गजानन महाराजांनी घडविले.गजानन महाराज हे दिगंबर वृत्तीतील सिध्दकोटीला पोहचलेले महाण संत होते. त्यांची दिनचर्या अशा पध्दतीची होती की वाटेल ते खावे, कोठेही पडुन रहावे व कोठेही संचार करावा अशा पध्दतीने ते रहात असे.एकेवेळी तर एका स्त्रीने मिर्चीचा वाटलेला मोठा गोळा खायला दिला तो गोळा त्यांनी मोठ्या आनंदाने खाल्ला जनुकाय पेढे-बर्फी खातात याप्रमाणे खाल्ला व लोटाभर पाणी पिऊन तृप्त झाले गण गण गणात बोते असे अहर्निश भजन उच्चारत निघून गेले.गजानन महाराजांच्या मुखातून नेहमीच "गण गण गणात बोते" या शब्दांचे उच्चारण व्हायचे त्यामुळे संपूर्ण भक्तगण श्री संत गजानन महाराज म्हणुन संबोधु लागले.गजानन महाराजांची अपार महिमा पाहून लोक त्यांना बहुमोल वस्त्रे, अलंकार,पैसे, खाद्य पदार्थ अर्पण करीत.परंतु हे सर्वच तेथेच टाकून निघून जात असे. मुख्यत्वेकरून भक्तांना व जनतेला गजानन महाराजांच्या सहवासाने मनःशांति मिळे व त्यांच्या ईश्वरलिलेमुळे सर्व भक्तगण प्रसन्न रहात.आजही महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात श्री संत गजानन महाराजांची पुजाअर्चना मोठ्या भक्तिभावाने व उत्साहाने साजरी केली जाते.त्याच अनुषंगाने दरवर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला श्री संत गजानन महाराजांचा प्रगट दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.यावर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला दिनांक १३ फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने गजानन महाराजांचा १४५ वा प्रगट दिवस साजरा होत आहे.दरवर्षी विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेगाव वरून संत गजानन महाराजांची पालखी जात असते व पालखी सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होतो.कारण गजानन महाराजांनी विठ्ठल रूपी अनेकांना दर्शन दिले आहे. दररोज शेगावला हजारोंच्या संख्येने वेगवेगळ्या भागातुन भाविक श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येतात. त्याचप्रमाणे याठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. कारण महाराष्ट्रासह अनेक राज्यातुन महाराजांचे दर्शन करण्यासाठी मोठा जनसैलाब असतो अशा प्रकारे श्री संत गजानन महाराजांची लीला अपरंपार असल्याचे आपल्याला दिसुन येते. महाराष्ट्रात घरोघरी गजानन महाराजांची पुजाअर्चना करून भक्तीभावाने संत गजानन महाराजांचा गजर करतात व आपली मनोकामना पूर्ण करतात. त्याचप्रमाणे प्रगट दिनाच्या निमित्ताने अनेक गावांत,शहरात मोठ्या प्रमाणात भजण, किर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते व आपल्याला सर्वत्र गजानन महाराज गजर ऐकायला मिळतो. संत गजानन महाराज हे महान संत होऊन गेले त्यामुळे त्यांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. कारण दिवसेंदिवस जंगलसंपदा नष्ट होतांना आपण पहातो. परंतु प्रगट दिनाच्या निमित्ताने फुल-नाही-फुलांची-पाकळी म्हणून वृक्षारोपण व्हायला हवे. कारण जंगल तोडीमुळे संपूर्ण निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे व हे सर्व आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. याचाच परिणाम आपल्यालाच नाही तर संपूर्ण जगाला भोगावा लागतो आहे. याचेच उदाहरण म्हणजे तुर्की-सिरियातील महाकाय भूकंप आहे.आपण निसर्गाचे संतुलन व्यवस्थित ठेवले नाही तर सुनामी, भूकंप,वनवालागने, समुद्राची पातळी वाढणे,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस याला मोठ्या प्रमाणात उफान येवु शकते व यामुळे मानवास,पशु-पक्षी, जीवजंतू यांची मोठी हानी होवू शकते. याकरीता आज निसर्गाला वाचविण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे.आपण व संपूर्ण भक्तगणांनी श्री संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवड केली तर निसर्ग प्रफुल्लित राहिल व झाडांच्या पानात,फुलात, फळात आपल्याला गजानन महाराजांचे दर्शन अवश्य होईल. कारण गजानन महाराजांचे संपूर्ण जीवन हे झाडांच्याच सानिध्यात रहाले आहे.वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन व सावली मिळेल.यातच आपल्या साक्षात संत गजानन महाराज अवश्य दिसून येईल व आपण केलेल्या कार्याच सार्थक अवश्य दिसून येईल.त्यामुळे भक्तांना आग्रहाची विनंती आहे की प्रगट दिनाच्या निमित्ताने जास्तीत जास्त वृक्षारोपण व्हावे या दृष्टिकोनातून पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे.श्री संत गजानन महाराजांच्या १४५ व्या प्रगट दिनानिमित्त कोटी कोटी प्रणाम;जय गजानन महाराज.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779



# जय जय रघुवीर समर्थ



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**नारायण सूर्याजीपंत ठोसर म्हणजेच समर्थ रामदास म्हणजे रामदास स्वामी यांचा जन्म 24 मार्च 1603 जांब, जिल्हा जालना येथे झाला. लहानपणी ते खोडकर होते पण अतिशय बुद्धिमान होते साहसी होते.**

झाडावर उड्या मारणे, पुरात पोहणे, घोड्यावर रपेट करणे, या गोष्टीत ते तरबेज होते. त्यांची आठ मित्र होते. एक सुतार ,दुसरा गवंडी, तर एक लोहाराचा, एक गवळ्याचा, आणि या मित्रांच्या सहवासात त्यांनी त्या त्या व्यवसायाचे उत्तम ज्ञान प्राप्त करून घेतले होते. निरीक्षण आणि अनुभवाने सर्व गोष्टी शिकल्या होत्या.

एकदा ते लपून बसले होते, काही केल्या सापडत नव्हते. अखेर ते सापडले तेव्हा त्यांना काय करीत होतास असे विचारणार ते आईला म्हणाले "मी विश्वाची चिंता करतो". तेव्हा या मुलाला संसारात अडकवले तर ताळ्यावर येईल या कल्पनेने त्यांचे वयाच्या बारावी वर्षी लग्न ठरविले. लग्नात "सावधान" हा शब्द उच्चारताच तो ऐकून ते नेसलेल्या व पांघरलेल्या वस्त्रांनिशी मंडपातून पळाले. लोकांनी खूप पाठलाग केला परंतु ते हाती लागली नाही.

तिथून निघून ते पायी चालत चालत पंचवटीत आले व रामाचे दर्शन घेतले. ते नाशिक टाकळीला आले .समर्थांनी बारा वर्षे तपस्या केली. तिथेही त्यांनी आपल्याला ओळखू नाही म्हणून रामदास हे नाव धारण केले. 1621 ते 1633 असे बारा वर्षे ते टाकळी येथे राहिले. तेथे साधना केली रोज ब्राह्म मुहुर्तावर ते सूर्यनमस्कार घालत. राम नामाचे 13 कोटी वेळा नामस्मरण करून झाल्यावर त्यांनी कार्याला आरंभ केला. त्यांनी साक्षात प्रभू रामचंद्रांना सद्‌गुरु मानले. तिथेच त्यांनी वेद उपनिषदे व शास्त्रे याचा अभ्यास केला. रामाची उपासना केली, प्रार्थना केली, करुणाष्टके लिहीलीत.

**सदा सर्वदा योग तुझा घडावा।तुझे कारणी देह माझा पडावा।उपेक्षु नको गुणवंता अनंता।रघुनायका मागणे हेचि आता... तुजविण रामा मजकंठवेना**

**हिच ती करुणाष्टके आहेत..**

आहेत बारा वर्ष तीव्र उपासना केल्यानंतर त्यांना आत्मसाक्षात्कार झाला असे म्हणतात. त्यावेळी त्यांचे वय 24 वर्षाचे होते. नाशिक टाकळी येथे त्यांनी गोमय,गाईच्या शेणापासून हनुमंताची स्थापना केली. हनुमान हे शक्तिशाली, बुद्धीची देवता आहे आणि त्यामुळे तिची उपासना केली पाहिजे असा समर्थांचा या मागचा विचार होता. इथले तपश्चर्या नंतर त्यांनी बारा वर्षे भारतभर भ्रमंती केली. निरनिराळ्या ठिकाणच्या समाजाच्या स्थितीचे निरीक्षण केले. भारतभर भ्रमंती केल्यानंतर 36 व्या वर्षी रामदास स्वामी पैठणला परत आले व पैठणला ते एकनाथांच्या वाड्यातच उतरले होते.

।।जय जय रघुवीर समर्थ।। या गर्जनेने मरगळलेला महाराष्ट्र जागा झाला. प्रभू श्री रामचंद्र आदिशक्ती तुळजाभवानी आणि शक्तीचे उपासनासाठी श्री हनुमंत या तीन देवतांची उपासना केली.


**सामर्थ्य आहे चळवळीचे,**
**जो जो करील तयाचे।**
**परंतु, तेथे अधिष्ठान पाहिजे।भगवंताचे।**

यानुसार त्यांनी भगवंतांची अधिष्ठान असलेली चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला समाज प्रबोधन करण्याचे समर्थांचे मुख्य उद्दिष्ट होते .त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार केला. भक्ति केल्यामुळे देव निश्चितपणे प्राप्त होतो असे त्यांनी दासबोधात सुरुवातीला सांगितले आहे. त्यांनी स्वतः बारा वर्षे नामस्मरण व भक्ती केली त्याचा प्रसार केला ते म्हणत "ज्या घरांमध्ये रामराम नाही ते घर सोडून खुशाल अरण्यात निघून जावे. ते महाराष्ट्रातील समर्थ संप्रदायाचे संस्थापक होते.

**शुका सारखे पूर्ण वैराग्य ज्याचे**
**वशिष्ठा परी ज्ञानयोगेश्वराचे**
**कवी वाल्मीका सारखा मान्य ऐसा**
**नमस्कार माझा सद्‌गुरु रामदासा....**

असे वामन पंडितांनी समर्थ रामदासांना उद्देशून लिहिले आहे.

दास मारुती, चाफळ. वीर मारुती, चाफळ. खडीचा मारुती, शिंगणवाडी, चाफळ. प्रताप मारुती, माजगाव, चाफळ. उंब्रज मारुती, तालुका कराड. शहापूर मारुती, उंब्रज जवळ. मसूर मारुती, तालुका कराड. बहे बोरगाव कृष्णामाई मारुती, जिल्हा सांगली. शिराळा मारुती,बत्तीस शिराळा, जिल्हा सांगली. मंडपाळे मारुती, जिल्हा कोल्हापूर. पारगाव मारुती, जिल्हा कोल्हापूर. अशा अकरा मारुतीची स्थापना त्यांनी केली. गावोगावी मारुतीची मंदिरे बांधली. मारुती शक्ती देवता असल्याने मंदिराच्या परिसरात ते तरुणांना संघटित करीत आणि व्यायामाची प्रेरणा देत होते. समर्थ रामदासांनी अकरा मारुती स्थापना केली तसेच जांब,. चाफळ ,सज्जनगड ,डोणगाव, शिरगाव, कनेरी ,या ठिकाणी मठाची स्थापना केली.समर्थांनी हजारचे जवळपास मंदिरे, मठ, स्थापन केले. समाजाविषयीच्या चळवळीतून समर्थांनी मोठीच वांग्मय निर्मिती केली.ग्रंथराज दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, आत्माराम, भीमरूपी स्तोत्र, गणपतीची आरती, शंकराची आरती, देवीची आरती, याची रचना केली. समर्थ रामदासांनी जवळपास 80 ते 90 आरत्या लिहिले आहेत. ग्रंथराज दासबोध या ग्रंथाची निर्मिती लिखाण शिवथरघळ येथे केली. आपल्या ग्रंथाच्या माध्यमातून जीवनात आलेल्या अनेक अनुभवातून समर्थ रामदासांनी लोकांना समाजात कसे राहावे कसे वागावे याविषयी अनेक प्रकारांनी मार्गदर्शन केले आहे व संदेश दिले आहेत



**मना सज्जना भक्ती पंथेची जावे**
**तरी श्रीहरी पावी जे तो स्वभावे**
**जनी निंद्य ते सर्व सोडूनि द्यावे**
**जनी वंद्य ते सर्व भावे करावे.....**

असे 205 मनाचे श्लोक लिहिलेत.. त्या प्रत्येकात त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

समर्थांनी राष्ट्र उभारण्यासाठी कार्य केले तसेच लोकशिक्षण, प्रपंच, परमार्थ, विवेक, यावर भर दिला. कारण यातूनच राष्ट्र उभे राहते स्वराज्य स्थापन होते लोकांनी साक्षर व्हावे यासाठी त्यांनी लिहिण्याची वाचण्याची सवय लागावी.. म्हणून ते म्हणतात

**दिसा माजी काहीतरी लिहावे**
**प्रसंगी अखंडित वाचीत जावे.. पुढे म्हणतात**
**जे जे आपणासी ठावे तेथे**
**शिकवावे शहाणे करून सोडावे सकाळ जन.**

पुढे ते म्हणतात प्रपंच सोडून परमार्थ केला तर केवळ आत्मांनद होईल, परंतु प्रपंच करून परमार्थ केला तर राष्ट्रोन्नती होईल म्हणूनच...

**प्रपंची जे सावधान ।तोचि परमार्थ करील जाण।**
**प्रपंची जो अप्रमाण।तो परमार्थी खोटा।।**

छत्रपती शिवाजी महाराज हे समर्थ रामदास स्वामींच्या विचाराचे होते तसेच स्वराज्य रक्षणासाठी समर्थ शिवाजी महाराज सोबत होते. 31 नोव्हे.1678 मध्ये समर्थ रामदास स्वामींना एक विस्तृतक्ष पत्र लिहून काही गावे भेट म्हणून दिली होती अशीही नोंद आहे.


निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी, यशवंत ,कीर्तीवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, पुण्यवंत ,नीतीवंत, जाणता राजा असे छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन समर्थ रामदासांनी केले आहे.

सातारा जिल्ह्यातील सज्जनगड हे महाराष्ट्रातील समर्थ संप्रदायाचे पवित्र क्षेत्र आहे. या ठिकाणी शके 1603, सन 1681 रोजी माघ वद्य नववीला रामदास स्वामींनी समाधी घेतली. शेवटचे पाच दिवस त्यांनी श्रीरामाचे मूर्ती समोर बसून निर्जल उपावास केला. राम राम जप करीत पद्मासनामध्ये बसून ते ब्रह्मलीन झाले. त्याच ठिकाणी हि समाधी आहे म्हणून या तिथीला "दासनवमी" असे म्हणतात. या समाधीवर रामाची मूर्ती बसवून देऊळ बांधले आहे. दास नवमीला या ठिकाणी म्हणजे सज्जनगडावर अनेक ठिकाणाहून लाखोच्या संख्येने भाविक आपली हजेरी लावतात.दर्शनाचा लाभ घेतात.

# प्रा. वि. घ. देशपांडे : देशपातळीवरील हिंदुत्ववादी नेता

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील जनतेने आणि त्यातल्या त्यात साहित्य क्षेत्रातील मंडळींना ना घ देशपांडे हे नाव सांगण्याचे काम नाही. मात्र त्यांचेच धाकटे भाऊ असलेले, एकाच वेळी मध्य भारतातील ग्वाल्हेर आणि गुणा या दोन मतदारसंघातून लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले आणि नंतर १९६८ मध्ये पदवीधर मतदारसंघातून महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत विजयी झालेल्या प्रा वि घ देशपांडे ह्या देशपातळीवरील हिंदुत्ववादी नेत्याची ओळख आजच्या पिढीला नसल्याने वक्तृत्वाच्या ,संघटन कौशल्याच्या बळावर आणि हिंदी, इंग्रजी,मराठीसह इतर अनेक भाषांवर अभ्यासपूर्ण प्रभुत्व असलेल्या, स्वातंत्र्यवीर वि दा सावरकर,डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी, यांचे उजवे हात अशी ओळख असलेल्या, सुभाषचंद्र बोस यांच्या समवेत काम केलेले आणि पंडित जवाहरलाल नेहरू याना देखील त्यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव करण्यासाठी महाराणी विजयाराजे शिंदे यांना निवडणूक रिंगणात उतरावे लागले अशा प्रा वि घ देशपांडे ह्या बुलडाणा जिल्ह्यातील आणि त्यातल्या त्यात मेहकर च्या ह्या त्या काळातील देशपातळीवरील हिंदुत्ववादी नेत्याच्या जीवनकार्याचा 'गोडवा' अचंबित करणारा आहे.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

कविवर्य ना घ देशपांडे यांचे लहान बंधू असणारे प्रा वि.घ. देशपांडे हे हिंदुमहासभेचे सेक्रेटरी होते. हिंदुत्ववादी चळवळीत आणि आंदोलनात सक्रिय असणारे, कराची ( आताचे पाकिस्तान ) , सिंध,पंजाब प्रांतात हिंदू महासभा रुजविणारे,युवकांचे संघटन करत भारत पाकिस्तानच्या विभाजनाला कडाडून विरोध करणारे,यासाठी कराची येथे तुरुंगवास भोगणारे आणि महात्मा गांधी हत्येनंतर ज्यांना सुमारे दीड वर्ष कारावास भोगावा लागला आणि त्यानंतर प्रतिबंधित झालेल्या हिंदू महासभेला पुनरुज्जीवित करून मध्य भारतातील ग्वाल्हेर आणि गुणा ह्या दोन लोकसभा मतदारसंघातून विजयी झालेले प्रा वि.घ. देशपांडे आजच्या पिढीतील मोजक्या लोकांनाच माहिती आहेत. वि घ यांचे मोठे भाऊ कविवर्य ना घ देशपांडे यांना अनेकजण जाणून आहेत. त्यांची शीळ लोकांच्या घराघरात आणि मनामनात शिरली,आणि त्याही पलीकडे जाऊन त्यांचे लहान भाऊ असणाऱ्या प्रा.वि घ देशपांडे यांचे वक्तृत्व देशभरात कानाकोपऱ्यात गाजले.

३० जानेवारी १९४८ ला महात्मा गांधीजी यांची हत्या करण्यात आल्याने हिंदू महासभेला मध्य भारतात बंदी घालण्यात आलेली होती. त्यामुळे हिंदू महासभेचे कार्यकर्ते कुठलीही कृती करू शकत नसल्याने हिंदुमहासभेत एक नैराश्येचे वातावरण निर्माण झालेले होते. अशावेळी त्याभागात एका महाराष्ट्र लॉज मध्ये वि घ देशपांडे यांनी आपले कार्यालय सुरू केले. हिंदू महासभा संपूर्ण जागेवर लढणार अशा आशयाचे एक वृत्त वर्तमानपत्रात त्यांनी प्रसिद्ध केले.त्यावेळी पेपर वाटण्याचे काम करणाऱ्यांना चांगला मोबदला देऊन त्यांना घरोघरी मोठ्याने ओरडत,प्रचार-प्रसार करत घरोघरी ते अंक टाकले आणि अशा पद्धतीने मरगळलेल्या हिंदू महासभेच्या कार्यकर्त्यांत नवचैतन्य निर्माण केले.
संपलेल्या हिंदुमहासभेत प्राण फुंकून संघटन कौशल्य, वक्तृत्व,अभ्यास ह्या सर्वच सद्गुणांमुळे ते ग्वाल्हेर आणि गुणा ह्या दोन्हीही लोकसभा मतदारसंघातुन ते विजयी झाले.राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर देशभर संतापाची लाट उसळली होती. हिंदुमहासभेवर मध्यप्रांतात अनेकदिवस प्रतिबंध लावण्यात आले होते. यामुळे कार्यकर्ते विभागले होते.अशाही परिस्थितीत पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मूळचे महाराष्ट्रातील रहिवासी आलेल्या प्रा वि घ देशपांडे यांनी दोन लोकसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. हिंदुमहासभेचे सेक्रेटरी या नात्याने संबंध देशभर आपले विचार पोहचविणे, भारत देश एकसंघ रहावा यासाठी जनचळवळ उभी करणे,युवकांचे संघटन करणे यासाठी वि घ देशपांडे यांच्या भाषनांनी कराची,सिंध, यासह काश्मीर,कलकत्ता,दिल्ली,लाहोर,पंजाब,लुधियाना, गोवा आदी ठिकाणी प्रो विष्णू घनश्याम देशपांडे अर्थात विघंच्या वक्तृत्वाच्या फैरी झडत होत्या.वि घ देशपांडे हे विविध पातळ्यांवर काम करणार नेतृत्व होतं. त्याकाळी प्रेसनोट काढणे आणि हिंदुमहासभेचे सेक्रेटरी या नात्याने विविध वर्तमानपत्रात स्टेटमेंट देऊन प्रसिद्ध होताच खळबळ उडवून देणे,हिंदुंमहासभेच्या कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण करणे, देशाच्या फाळणी विरोधात लाहोर येथे आंदोलन उभे करणे,त्यात त्यांना लाहोर येथे अटक होऊन ८-१० दिवसानंतर त्यांची सुटका होणे,आर्य समाजाच्या स्वामी दयानंद यांच्या सत्यार्थप्रकाश या पुस्तकातील हिंदुत्ववादी विचारामुळे कराची येथे त्या पुस्तकावर घातल्या गेलेली बंदी आणि त्या बंदी विरोधात उभ्या झालेल्या आंदोलनाचे नेतृत्व करायला गेलेल्या वि घ देशपांडे यांना कराची येथे देखील झालेली अटक यासह विविध आंदोलनातील सहभागामुळे वि घ देशपांडे यांचे नेतृत्व चांगलेच समोर आले होते. हिंदू महासभेचा नेता,पत्रकार, फर्डा वक्ता, विविध भाषांचे ज्ञान यामुळे वि घ देशपांडे देशभर विविध राज्यात चांगलेच ओळखल्या जायचे. मध्यभारताची जबाबदारी सांभाळताना प्रसिद्धी माध्यमाच्या साहाय्याने अस्तित्व संपत आलेल्या हिंदुमहासभेला सतत चर्चेत ठेवले.हिंदुमहासभा मध्य भारतातील सर्व जागा लढणार, हिंदुमहासभा मध्यभारतात आपले सरकार बनविणार अशा बातम्यांद्वारे त्यांनी इतरत्र फारसा प्रभाव नसणाऱ्या हिंदुमहासभेला चांगलेच चर्चेत ठेवले.परिणामी १९५२ च्या लोकसभा निवडणुकीत ग्वाल्हेर आणि गुणा ह्या दोन्हीही लोकसभा मतदारसंघातून एकाच वेळी ते विजयी झाले. त्याकाळी एकच उमेदवार दोन दोन मतदारसंघातून विजयी झालेल्या मध्ये वि घ देशपांडे आणि आंध्र प्रदेशातील एक कम्युनिस्ट नेता असे केवळ दोन जण एकाच वेळी दोन वेगवेगळ्या मतदारसंघातून लोकसभेवर विजयी झाले होते. नंतर वि घ देशपांडे यांनी ग्वाल्हेर च्या लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला,आणि त्या जागेवर त्यांनी हिंदुमहासभेचे डॉ एन बी खरे हे निवडून आणले. वास्तविक डॉ परचुरे यांचा ग्वाल्हेर मधून उमेदवारी अर्ज भरण्यात आलेला होता,तर डमी अर्ज म्हणून वि घ देशपांडे यांनी स्वतःचा टाकला होता.डॉ परचुरे यांना निवडणूकच लढायची नसल्याने त्यांनी हेतुपुरस्सर उमेदवारी अर्ज भरतांना त्यात तांत्रिक चूक ठेवली व त्यांचा अर्ज छाननीत बाद झाला आणि वि घ यांना एकाच वेळी दोन दोन लोकसभा मतदारसंघातून लढावे लागले होते. गम्मत म्हणजे त्यानंतरच्या १९५६ च्या दुसऱ्या लोकसभा निवडणुकीत वि घ देशपांडे हे लोकसभेसाठी उभे राहले. ग्वाल्हेर मधून हिंदुमहासभेचे वि घ आणि त्यानंतर पोटनिवडणुकीत डॉ खरे निवडून येणे यामुळे ग्वाल्हेरची किल्ली आम्हाला सापडत नाही असे उदगार पंडित जवाहरलाल नेहरू यांनी काढले होते.पुन्हा निवडणूक रिंगणात वि घ देशपांडे उतरल्याने पंडित जवाहरलाल नेहरू चिंतेत होते. कुठल्याही परिस्थितीत त्यांना ग्वाल्हेर मतदारसंघ हिंदुंमहासभेच्या हातून काढायचा होता. त्यावेळी डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी लोकसभेत ४० खासदारांची राष्ट्रीय लोकतांत्रिक आघाडी उभी केली होती.त्या आघाडीचे वि घ देशपांडे कार्यवाहक होते. पुन्हा वि घ देशपांडे लोकसभेत येणे पंडित जवाहरलाल नेहरू यांना परवडणारे नव्हते.त्यामुळे गुणा लोकसभा मतदारसंघ ताब्यात घेण्याची रणनीती ते आखत होते.याच चिंतेतून ग्वाल्हेर च्या महाराणी विजयाराजे शिंदे यांना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी गुणा या लोकसभा मतदारसंघात वि घ देशपांडे यांच्या समोर उभे केले.शिंदे या राजघराण्याचा असलेला प्रभाव, लोकांमध्ये महाराणी यांच्या बद्दल असलेला आदर पाहू जाता आपसूकच वि घ देशपांडे यांचा या निवडणुकीत पराभव झाला मात्र याच वेळी गुणा लोकसभा मतदारसंघातील एकूण ८ विधानसभा मतदारसंघांपैकी सिरोज आणि मुंगावली येथे हिंदुमहासभेचे उमेदवार विजयी झाले.तर गुणा जवळील शिवपुरी मतदारसंघातून पं. ब्रजेश केंद्रीय विधिमंडळात निवडून आले. तब्बल दोन मतदारसंघातून विजयी झाल्याबद्दल तत्कालीन सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांनी वि घ देशपांडे यांना पत्र पाठवून त्यांचे तोंडभरून कौतुक केले होते. हिंदुसभेला गतिशील, प्रभावी करण्यासाठी सारखी धडपड करणारा,चिंता वाहणारा आणि त्यादृष्टीने विविध प्रयोग करणारा नेता म्हणून देखील वि घ देशपांडें यांची ओळख होती.



स्वस्थ बसून राहणाऱ्या मधील वि घ देशपांडे हे व्यक्तिमत्त्व नव्हतेच मुळी. कार्यकर्त्यांना प्रेरित आणि गतिशील करण्यासाठी त्यांनी काशी-विश्वनाथ मंदिर पुंनरुद्धार आंदोलनाचा श्री गणेशा केला.व मोठे आंदोलन उभें केले.काश्मीर सत्याग्रह देखील वि घ यांनी सुरू केला मात्र काश्मीर प्रवेशापुर्वीच वि घ देशपांडे यांना आंबल्यालाच अटक करण्यात आली होती.

काश्मीर चा सत्याग्रह संपतो न संपतो तोच त्यांनी गोव्याच्या स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले.तिथे देखील त्यांना अटक झाली आणि ते खासदार असल्याने एका खासदाराला अटक झाल्याने त्यांची अटक चांगलीच गाजली होती. महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर हिंदुमहासभा अगदी १९६२-६३ पर्यंत वि घ देशपांडे या एकाच खांबावर उभी होती असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.
तर विश्व हिंदू परिषद अर्थात विहिप चे मूळ कल्पक देखील वि घ देशपांडे हेच होते.
गुणा लोकसभेत महाराणी विजयाराजे शिंदे यांच्याकडून पराभूत झाल्यानंतर खचून न जाता वि घ देशपांडे यांनी पूर्व बंगाल चा हिंदुचा प्रश्न ,युकॅरिस्ट कॉंग्रेस,आणि कार्डिनल ग्रेशसचा विरोध असे विविध कार्यक्रम त्यांनी सुरूच ठेवले होते. पण तरीही हिंदुमहासभेत वाढ होत नव्हती,अंतर्गत गटबाजी वाढली होती. शेवटी काही केल्या यात बदल होत नसल्याचे जाणवल्याने वि घ देशपांडे यांनी जनसंघात प्रवेश केला तर तिकडे राजमाता विजयाराजे शिंदे यांचे देखील तत्कालीन मुख्यमंत्री द्वारकाप्रसाद मिश्रा यांच्याशी मतभेद झाल्याने त्या देखील कॉंग्रेस मधून बाहेर पडल्या व त्यांनी जनसंघाशी युती केली. याच काळात वि घ देशपांडे पुन्हा मेहकर येथे स्थायिक झाले.अगदी कराची कार्पोरेशन चे निर्वाचित सदस्य राहिलेल्या वि घ देशपांडे यांना महाराज या नावाने ओळखल्या जायचे.अगदी बालपणी त्यांना टिल्ल्या या नावाने आवाज दिल्या जायचा,वडीलधारी त्यांना टिल्ल्या च म्हणायची. वि घ देशपांडे एकाचवेळी दोन लोकसभा मतदारसंघातून विजयी झाल्यानंतर ते जेव्हा मेहकर ला आले होते,तेव्हा त्यांना घोड्यावर बसवून त्यांची जंगी मिरवणूक काढण्यात आली होती.मूळचे साखरखेर्डा येथील रहिवासी असलेल्या देशपांडे यांची साखरखेर्डा येथे देखील विजयी मिरवणूक काढण्यात आली होती.हिंदुमहासभेचा राष्ट्रीय पातळीवरील नेता असलेल्या वि घ देशपांडे यांना हिंदुमहासभा सोडावी लागली व ते जनसंघात गेले.जनसंघाने त्यांना विधानपरिषदेची पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढवायला सांगितली.त्या निवडणुकीत ते विजयी झाले.विधानपरिषद मधील पहिलेच भाषण हिंदुत्वावर झाले.आपण हिंदुमहासभा सोडली,हिंदूत्व नव्हे असे उत्तर त्यांनी पत्रकारांना दिले होते. खासदार आणि विधानपरिषद सदस्य राहीलेल्या वि घ नी ७ डिसेंबर १९७५ रोजी एक्झिट घेतली. संपूर्ण देशाचा अभ्यास असणाऱ्या वि घ ना आपला विदर्भ,आपला मेहकर तालुका ( त्यावेळी मेहकर,लोणार आणि सिंदखेडराजा हे तीन तालुके मिळून एक तालुका होता तर चिखली तालुक्याचा बराचसा भाग हा मेहकर तालुक्यात होता.)
सर्वांगीण दृष्टीने विकसित व्हावा असे त्यांना सतत वाटायचे.नेपाळच्या नरेश सोबत, तत्कालीन राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या समवेत सलोख्याचे संबंध असणाऱ्या माजी खासदार,माजी विधानपरिषद सदस्य असलेल्या वि घ यांना जाऊन आज 47 वर्षांपेक्षा अधिकचा कालावधी होतो आहे. मात्र मातृतीर्थ जिल्ह्यातील या तत्कालीन हिंदुत्ववादी नेत्याने परप्रांतातून देशाच्या सर्वोच्च सभागृहात जाऊन नेतृत्व केले आहे तर राज्याच्या वरिष्ठ सभागृहात देखील आपली छाप पाडत राष्ट्रीय पातळीवर आपले नेतृत्व सिद्ध केले हे महत्वाचे !
मात्र हिंदुमहासभेतून जनसंघात गेलेल्या वि घ चा देखील राजकीय गेमच करण्यात आला.
जनसंघाकडून राज्यसभेवर पाठविल्या जाईल असे सांगून जनसंघात घेतलेल्या वि घ यांना राज्यसभेवर पाठवले नाहीच मात्र विधानपरिषद चि आपली दुसरी देखील जागा निवडून आणायची असेल तर त्या जागेवर वि घ यांनाच उमेदवारी देणे राजकीयदृष्ट्या योग्य असल्याने त्यांना पदवीधर मतदारसघातून निवडणूक लढवायला लावली.
अनेक बाबतीत नंतर त्यांचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न झाला.वास्तविक आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी सावरकर यांनी ज्या विश्वासाने त्यांच्यावर हिंदू महासभेची जबादारी वि घ च्या खांद्यावर टाकली होती,त्या वि घ यांनी गांधी हत्येनंतर हिंदू महासभेला सावरण्याऐवजी जनसंघात प्रवेश केला. सावरकर यांच्या शब्दाखातर नागपूर येथे मॉरिस कॉलेजमध्ये प्राध्यापक असतांना वि दा सावरकर यांच्या आवाहनाचा स्वीकार केला.त्याच सावरकरांच्या हिंदू महासभा ला राम राम ठोकला.
पदवीधर आमदार म्हणून १२ एप्रिल १९७४ रोजी निवृत्त होणाऱ्या सभासदांना निरोप देण्याच्या भाषणात त्यांनी स्पष्टच मला पुन्हा या सभागृहात परत यायचे नाही असे स्पष्ट सांगितले.
राजकारण काही राम-रावणाचे युद्ध नाही. ज्या स्पिरिट ने क्रिकेटचा खेळ खेळण्यात येतो त्या स्पिरिट ने राजकारण करावयाचे असते अशी प्रांजळ अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.
शेवटी असेच म्हणता येईल की,

***लडना चाहता हुं अपनो से***
***पर कही जित गया तो हार जाउंगा***

# विवाहाची वयोमर्यादा संपत आली तरी लग्न जुळेना

आधुनिक केसरी

अपेक्षा ही उपेक्षा होऊ नये इथपर्यंत काळजी दक्षता घेतली तर अडचण उद्भवत नाही .पण



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

अपेक्षा जर एक मर्यादा ओलांडून पुढे गेली तर मग हिच अपेक्षा आपल्या साठी एक गंभीर अशी समस्या म्हणून उभा रहते हे संसारातील वास्तव आहे. कौटुंबिक सामाजिक स्थैर्य टिकण्यासाठी विवाह हा आवश्यक धर्म संस्कार आहे. आपल्या संस्कृती नुसार विवाह हा एक संस्कार असला तरी त्याची एक निश्चित अशी वयोमर्यादा पण निश्चित आहे. ही वयोमर्यादा म्हणजे लक्ष्मण रेषा हि रेषा ओलांडून आपलं वय पुढे जाऊ नये अशी धाकधूक सर्व विवाहाच्या प्रतिक्षेत असलेल्या वधुवरा मध्ये असते पण बोलता येत नाही व्यक्त होता येत नाही. आपण ज्या संस्कृती मध्ये वाढतोय तिथं काही बाबी न बोलता सुद्धा समजुन घ्याव्या लागतात आणि हे समजणं गरजेचे आहे. शिक्षणाचा प्रदीर्घ कालावधी त्यातच नौकरी संधी मिळेपर्यंत स्थळ व्यवस्थित मिळत नसल्याने आणि जास्तीत जास्त पालक नौकरीला असणार्या वराच्या शोधात असल्याने सहाजिकच इतर उद्योग व्यवसाय नसलेल्या वराच्या बाबतीत अडचणी समस्या उद्भवतात स्थळ लवकर जुळत नाही हे वास्तव आहे.आणि याच दरम्यान वाढती बेरोजगारी,हि तर विवाहाचे वय वाढण्याची सगळ्यात मोठी बाब आहे. स्वतःच्या पायावर उभं राहिल्यानंतर विवाह करू अशी अनेक तरूणांची मानसिकता असल्याने या प्रयत्ना मध्ये अनेक दिवस निघून जातात आणि मग इथंच गडबड होते . त्या मध्ये वधु पिता व वधु च्या एकंदरीत वाढत्या अवाजवी अपेक्षा यामुळे विवाह जुळण येण्या मध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहेत. या अडचणी मुळे विवाहासाठी निश्चित निर्धारीत असणार वय कधी ओलंडल जात आहे हे लक्षात पण येत नाही .या सगळ्या बाबी मध्ये अनेक तरूण तरूणी यांच्या विवाह संदर्भात वयोमर्यादा ओलांडली जात आहे. व अनेक तरूण तरूणी हे विवाहाच्या प्रतिक्षेत आहेत हे वास्तव असल्याने हि समस्या का निर्माण होत आहे. भविष्यात अशी परस्थिती निर्माण होऊ नये म्हणून सामाजिक पातळीवर या विषयाचं चिंतन आवश्यक झालं पाहिजे. अन्यथा विवाह हि भविष्यातील सगळ्या मोठी सामाजिक कौटुंबिक समस्या म्हणून रुद्र रूप धारण करेल या मध्ये शंका नाही. प्रत्येक तरूण तरूणी यांच्या मनात आपल्या स्वतःच्या विवाहाच्या संदर्भात अनुषंगाने एक उत्सुकता असते एक विश्व निर्माण झालेलं असतं.भावी जीवन कसं असेल याचा निश्चित असा एक आराखडा ठरलेला असतो .पण सध्या अनेक आशा विविध कारणांमुळे विवाह मर्यादे पलिकडे तरूण वर्ग जाताना दिसत आहे. आशा वेळी हाच विवाह संस्कार आई वडील पालक नातेवाईक यांच्या सह स्वतः वर सुद्धा याचे तणावजनक परिणाम होत आहेत. याच तणावातुन अनेक जण वाम मार्गाने तर कित्येक व्यसनाधीनतेची शिकार होत आहेत.या सगळ्या घटना घडामोडी सामाजिक स्वस्थ बिघडवणारया असल्याने याबाबत गांभिर्याने चिंतनशील असणं गरजेचं आहे. विवाहाच्या अनुषंगाने काही विशिष्ट म्हणजे कुळ , गोत्र, नातेसंबंधातील परिचय इथ पर्यंत च्या बाबींची माहिती असणं ठिक आहे. परंतु अवाजवी अपेक्षा ठेवल्या तर त्या अपेक्षा पुर्ण होण्या मध्ये अडचणी निर्माण होतील परिणामी विवाह घडुन येण कठिण होईल.बर विवाह हा काही कित्येक वर्षे चालणारा उपक्रम नाही.फार फार अंतिमतः पस्तीस वर्षे आति झाली. एका विशिष्ट कालावधी मध्ये कोणत्याही परिस्थितीत विवाह झाला पाहिजे.वधु वर यांनी आपल्या अनंत अपेक्षांना थोडी थोडी कात्री लावत दोन पावलं माघर घेण हितकारक आहे.ज्यामुळे योग्य वयात विवाह होतील सामाजिक स्वस्थ टिकेल यासाठी फार अपेक्षा न बाळगता विवाह हा संस्कार विहित वेळेत पूर्ण होण्यासाठी समाज भावना मान पान सन्मान मोठेपणा यापलीकडे जाऊन काही बदल स्वीकारले पाहिजेत त्याच प्रमाणे फाजिल अपेक्षा न बाळगता विवाह जुळतील असे प्रयत्न पालकांसह वधू वर यांनी सुद्धा योग्य सहकार्य करण्याची आवश्यकता आहे..

# शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करावी : उद्योजक मनोज पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील सार्वजनिक शिवजयंती दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी मोठ्या उत्साहात साजरी होणार असे शिवजयंती संस्थापक अध्यक्ष शिवसेना शहर अध्यक्ष सुनिल पवार यांनी सांगीतले या वेळी पवार यांच्या अध्यक्षतेखाली.

अध्यक्ष उपअध्यक्ष इत्यादी पदअधिकारी यांची निवड करण्यात आली. त्यानंतर उदयोजक मनोज पवार व मित्रमंडळा तफै सार्वजनिक शिवजयंती अध्यक्ष, उपअध्यक्ष, पदअधिकारी यांचे स्वागत करण्यात आले या वेळी उदयोजक मनोज पवार बोलतांनी म्हणाले छत्रपती शिवाजी महाराज यांनी अठरापकड जातीतील लोक सोबत घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापन केले म्हणुन या महापुरुषाच्या जयंती साठी कन्नड येथील सर्व जाती जमातील महिला, पुरुषांनी एकत्र येऊन या महापुरुषाची जयंती साजरी करण्यासाठी सर्व मतभेद बाजुला सारून एकत्र येऊन महाराजांच्या जयंतीत सामिल होऊन मोठ्या उत्साहात जयंती साजरी करावी. तसेच सर्व राजकीय पुढारी यांनी पक्ष भेद बाजुला सारून ज्या महापुरुषानी हिंदवी स्वराज्य उभे करण्यासाठी व अठरापकड जाती जमाती एकत्र आणन्यासाठी अहोरात्र परीश्रम घेतले त्या विचाराने संपुर्ण देशात कुतुल होत आहे अश्या महापुरुषाच्या जयंतीत सामील होऊन आपला सहभाग नोंदवावा असेही बोलतांनी म्हणाले. या वेळी उदयोजक मनोज पवार, शिवसेना शहर अध्यक्ष सुनिल पवार शिवजयंती अध्यक्ष संदिप खरे उपअध्यक्ष पवन ठाकुर, मनोज देशमुख, सिध्दार्थ निकाळजे, बाळु आल्हाड, सोपान शिरसाठ, अनिल खंबाट, प्रविण घाडगे, संदेश पवार, हिंदराज लखवाल, संतोष पवार, सलीम शेख, संदिप घोगटे इत्यादींची उपस्थीती होती .






# कनकशीळ उपकेंद्रात जागरूक पालक, सुदृढ बालक मोहिमेस सुरवात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जागरुक पालक सुदृढ बालक या 0 ते 18 वर्षे वयोगटातील बालके आणि किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणी मोहिमेची सुरुवात कनकशीळ आरोग्यवर्धीनी केंद्राच्या वतीने कानडगाव येथी जि.प प्रा शाळेतुन करण्यात आली. तपासणी ला सुरवात करण्यापुर्वी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.रमेश शेळके यांनी या मोहिमेचे महत्व विद्यार्थी पालक आणि शिक्षक यांना समजाऊन सांगितले तसेच आपल्या बालकाचा सर्वांगीण विकास करून त्याला शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या सदृढ बनविण्यासाठी जागरुक पालकांनी तत्पर असण्याचे त्यांनी सांगितले,या वेळी एकुण 116 मुला मुलींची वजन उंची घेऊन संपुर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली, यामध्ये एकूण यु आर टी आय-5, दंतरोग-20, त्वचारोग-4,नेत्ररोग-4,कर्णरोग-3, रक्तक्षय-3,शल्यरोग-4 इ आजार असलेल्यांचे प्राथमिक निदान करण्यात आले आणि त्याना ग्रामीण रूग्णालय खुलताबाद येथे पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले.तसेच यावेळी इतर सामान्य आजरांसाठी औषध उपचार करण्यात आले. यावेळी योगा च्या माध्यमातून स्वतःला सदृढ ठेवण्यासाठी योगा प्रत्यक्षिक हे सदर करण्यात आले. या शिबिरासाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.रमेश शेळके,डॉ वैभव बाविस्कर, डॉ विशाल ढेपे, आरोग्य सहायक विजय जाधव, आरोग्य सेवक अनिल बनकर,आरोग्य सेविका ज्योती चिमणे, मुख्याध्यापीका उज्वला कलाने आणि इतर शिक्षक वृंदानी शिबिरासाठी सहकार्य केले.

# मंगळवेढा नगरपरिषदेसाठी २६ कोटी १४ लाखांचा निधी : आ. समाधान आवताडे

आधुनिक केसरी न्यूज

अनेक वर्षे आपला करा राजकीय उदासीनतेमुळे मंगळवेढा शहर विकासाच्या प्रवाहापासून कोसो दूर गेले होते परंतु आमदार आवताडे यांनी खेचून आणलेला एवढा भरीव निधी शहराचा कायापालट होण्यासाठी निश्चितपणे उपयोगी पडेल . आमदार आवताडे यांची ही विकासाभिमुख पद्धत शहराला प्रगतीच्या वेगळ्या उंचीवर घेऊन जाईल असा विश्वास प्रत्येक नागरिकाच्या मनात निर्माण झाला आहे . **हणमंत बिनवडे, मंगळवेढा**

**सोलापूर :** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी अंतर्गत २९ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी मंगळवेढा नगरपरिषद या संस्थेसाठी २६ कोटी १४लाख रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे. मंगळवेढा शहरातील नागरिकांच्या मूलभूत आणि पायाभूत सोयी - सुविधांच्या पूर्ततेसाठी या निधीच्या माध्यमातून मोठी चालना मिळणार आहे. मंगळवेढा नागरी हद्दीमध्ये वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांच्या घनकचरा व स्वच्छता विषयी असणाऱ्या इतर समस्या आणि अडी -अडचणी मार्गी लावण्यासाठी तसेच शहर भागातील स्वच्छता संकल्पनेस अधिकतम पद्धतीने गतिमान करण्यासाठी या निधीचा शहरवासीयांना खूप मोठा फायदा होणार आहे.

उपलब्ध निधीमार्फत शहरामध्ये गोळा होणारा घनकचरा एकत्रित करून त्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आधुनिक पद्धतीची साधनसामुग्री खरेदी करणे, गोळा झालेल्या कचऱ्याचे विभाजन करून त्यावर प्रक्रिया करणे व पुनर्वापरासाठी त्या कचऱ्यावर विविध प्रक्रिया करणे. नियोजित प्रक्रिया करण्यासाठी कचऱ्याच्या घनतेनुसार व आकारानुसार कचरा शेड यांची उभारणी करणे. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये शहराच्या विविध भागांत पाणी प्रवाहाच्या अडचणीमुळे साठणाऱ्या पाण्यासाठी विशिष्ट पद्धतीच्या गटारांची बांधणी करून निर्मिती करणे व दूषित पाणी शहर हद्दीबाहेर जाण्यासाठी उपाययोजना करणे. पाण्याची बचत ही काळाची गरज या अभियानानुसार पावसाच्या पाणी जमिनीमध्ये जिरविण्यासाठी विशिष्ट पद्धतीचे खड्डे बांधणे. शहराच्या निरनिराळ्या भागामध्ये आशा खड्ड्यांची निर्मिती केल्याने मुबलक प्रमाणात पावसामुळे पडणारे पाणी आवश्यक ठिकाणी थांबवणे सोयीचे होईल.

# सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांची वीज तोडणी थांबवून वीज पुरवठा सुरु करा

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र कांबळे**

**सांगोला :** तालुक्यातील शेतक-यांची वीज तोडणी थांबवून तात्काळ वीज पुरवठा सुरु करावी या मागणीचे निवेदन शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी यांच्यावतीने महावितरणचे अधिकारी यांना देण्यात आले.

सांगोला तालुक्यातील शेती पंपासाठी सुरु असलेला वीज पुरवठा महाविरण विभागाकडून कोणतीही पूर्व सूचना न देता खंडीत करण्यात आला आहे. त्यामुळे पिकांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच सांगोला तालुक्यातील असंख्य शेतक-यांच्या फळबागा, भाजीपाला. जनावरे, गुरे यांच्या पिण्याच्या पाणीसाठी यांना देखील वीज तोडणीचा फटका बसत आहे. अचानकपणे तोडण्यात आलेला वीज पुरवठयामुळे शेतकरी हतबल झालेला आहे.

यामुळे अनेक शेत पिकांचे मोठे नुकसान होत आहे. नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करुन भरपाई करण्यात यावी. शेतकरी व वीज पुरवठा अधिकारी यांनी

समन्वयाने मार्ग काढून वीज पुरवठा सुरळीत करण्यात यावा ही विनंती करण्यात आले यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच महावितरणचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी जिल्हा प्रमुख संभाजी राजे शिंदे, तालुकाप्रमुख सूर्यकांत गाडगे, तालुका समन्वयक भारत मोरे, सांगोला शहर प्रमुख कमरुद्दीन खतीब, उपतालुकाप्रमुख अरविंद पाटील, उपविभाग प्रमुख रघुनाथ ऐवळे, युवा नेते तुषार इंगळे, पोपट खरात, अक्षय रुपनर, ज्ञानेश्वर पोळ, उद्धव हिप्परकर, दगडू होनमने, गणेश खाडे, संजय अनुसे, संजय तंडे, दादा सकट, भाऊसाहेब शिंदे, सागर जावीर, गणेश घाडगे यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





# महावितरण कार्यालयावर पांडुरंग परिवार आणि भाजपाच्यावतीने आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** पांडुरंग परिवार आणि भाजपाच्या वतीने महाराष्ट्र राज्य सरकारचे शेती पंपाची विज बंद करण्याचे कोणतेही आदेश नसताना पंढरपूर विजवितरण कंपनीच्या अधिकारी यांचा मनमानी कारभार करत शेतकर्याचा विद्युत पुरवठा बंद आला होता. यामुळे सर्व शेतकर्याची पिके धोक्यात येत आहेत व जनावरांचा पाण्याचा प्रश्न उद्भवत आहे. या वित वितरण अधिकाऱ्याच्या आडमुट्या धोरणामुळे शेतकरी अडचणीमध्ये येत आहे.सोलापूर जिल्ह्याचे आ.प्रशांतराव परिचारक साहेब यांच्या सुचनेनुसार व युवक नेते मा.प्रणव परिचारक यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी पंढरपूर व पांडुरंग परिवार यांच्या वतीने हाजारो शेतकरी बांधवा सोबत घेवून महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, पंढरपूर याठिकाणी निवदेन देण्यात आले. अधिकाऱ्यास सर्व शेतकऱ्यांनी जाब विचारला असता त्याठिकाणी त्वरीत विज पुरवठा सुरळीत करतो असे आश्वासन दिले.गेल्या दहा ते बारा दिवसापासून महाराष्ट्र राज्य सरकारचा कोणताही जीआर नसताना डि.पी. ट्रान्सफार्मर उतरवण्याचे काम सुरू केल्याने अतिशय चांगले काम करणारे तसेच शेतकरी हिताचे शिंदे-फडणवीस सरकार काम करत असताना शेतकर्याच्या मनामध्ये अधिकाऱ्याच्या झुलमी कारवाईमुळे शेतकऱ्याच्या मनामध्ये असंतोष निर्माण करण्याचे पाप महावितरण अधिकारी करत होते. त्यामुळे आज हजारो शेतकरी यांना सोबत घेवून महावितरण अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. वाढता उन्हाळा हाता तोंडाला द्राक्षचे पीक, डाळींब, जनावराच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न हे सर्व महावितरण अधिकारी यांच्या लक्षात आणून दिल्याने तात्काळ आजपासून विज सुरळीत करतो असे सर्व शेतकरी बांधवा समोर महावितरण अधिकारी मा.भुतडा साहेब यांनी जाहिर केले. यावेळी भुतडा साहेब यांनी जाहिर केले.

# रत्नाळी येथील शिंदी भट्टी पुन्हा चालू करण्याच्या हालचालींना वेग

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** देगलूर तालुक्यातील शिंदी - ताडी विक्रेता आपले देगलूर मधील बस्तान गुंडाळून धर्माबाद (रत्नाळी) येथे आपला संसार थाटण्याच्या तयारीत होता मात्र रत्नाळीवासियांनी आणि पत्रकारांनी या विरोधात आवाज उठविल्यामुळे काही काळासाठी हे प्रकरण थंड बस्त्यात पडले होते. मात्र लक्ष्मीदर्शनाच्या साहाय्याने आपला व्यवसाय थाटण्याच्या तयारीत असल्याचे विश्वासनीय सूत्रांकडून माहिती मिळाली आहे. ह्या भट्टी चालकाला विरोध होण्याचे प्रमुख दोन कारणे होते. एक धर्माबाद तालुक्यात चेरलेवार यांचे शिंदीचे बन वगळता एकही झाड नाही तरीही येथे ताडी किंवा शिंदी लोकांना शुद्ध कशी मिळणार? दोन, धर्माबाद व रत्नाळी परिसरातील अनेक तरुण,महिला,बालके शिंदी व्यसनाच्या आहारी गेले आहेत.त्यातील काही जणांनी नशेतच आत्महत्या केली आहे.परिणामी अनेकांचे संसार उद्धवस्त झाले आहेत.हे दोन्ही कारणे 'जैसे थे' असताना पुन्हा हा शिंदी भट्टी चालक कशाच्या बळावर पुन्हा डोके वर काढत आहे.

धर्माबाद तालुक्यात व तालुक्यापासून जवळपास पन्नास ते शंभर किलोमीटर शिंदी व ताडीचे झाड नसल्यामुळे शिंदीच्या नावाखाली केमिकल मिक्स करून शिंदी म्हणून सर्रास विक्री केली जाते.ह्या मुळे लोकांना अनेक आजार जडतात. तसेच लोकांना अडीक्शन झाले की, वेळेवर शिंदी न मिळाल्यास वेडसरपणा करू लागतात. महत्वाचे म्हणजे प्रस्तावित शिंद्वी भट्टीच्या परिसरात लहान मुलांचे वसतिगृह आहे तसेच कुंभार समाजाचे मंदिर आहे. गावाकऱ्यांनी आपल्या गावातील तरुणांचे भविष्य बरबाद होऊ नये यासाठी तीव्र विरोध केला होता. तरीही लोकांचे जीव धोक्यात टाकून रत्नाळी येथे शिंदी भट्टी चालू करण्याचा अट्टहास केला जात आहे.

गावात शिंदीचे झाड नाही, जागा स्वत : च्या मालकीची नाही, परिसरात लहान मुलांचे वसतिगृह व मंदिर आहे, गावकऱ्यांचा तीव्र विरोध आहे . तरीही जर शिंदी भट्टी चालक पुन्हा चालू करण्याचा दुसाहस करीत असेल तर उत्पादन शुल्क विभाग, नगर परिषद प्रशासन, पोलीस प्रशासन नेमकी काय भूमिका घेते याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत .

जाणकारांच्या मते,

शिंदी भट्टी चालू करण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा असावी लागते. परिसरात शिंदीचे झाडे असावी लागतात, परिसरातील लोकांची नाहरकत लागते, नगर परिषदेची परवानगी घ्यावी लागते, उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यांना जाय मोक्क्यावर जाऊन पाहणी करावी लागते.



# मूल्यांची जपवणूक हीच खरी देशभक्ती

## शिवसाधिका साध्वी दुर्गादीदी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारतीय संस्कृती व भारतीय नैतिक मूल्ये जगात सर्वश्रेष्ठ व महान असून याचे मनापासून पालन आपल्या कृतीत आणून केल्यास व आपल्या मुलाबाळांवर हे संस्कार योग्यरित्या बिंबविल्यास आपला देश जगातील सर्व श्रेष्ठ देश ठरेल व महाशक्ती म्हणून गणल्या जाईल असे प्रतिपादन शिवसाधिका साध्वी दुर्गादीदी यांनीशनिवार(ता,११ )रोजी श्री गजानन महाराज प्रकट दिन निमित्त आयोजित त्रिदिवशीय कीर्तन कार्यक्रमात केले वैजापूर येथे केले.

त्यांनी महाराष्ट्र राज्याची महिमा ही गायिली ,भारतीय महापुरुष व रणरागिणी यांच्या शौर्य ची आठवण ही उपस्थितीताना करून दिली,देशातील माता संस्कृती च्या उपासक आहेत असेही त्या पुढे म्हणाल्या.

या प्रसंगी अजय भुजबळ,सोनाली भुजबळ, श्रावन चौधरी व जयश्री चौधरी, श्याम आगाज यानी दीदींचे पूजन केले. या प्रसंगी नगरसेवक गणेश खैरे, शैलेश चव्हाण, नगरसेविका शोभाबाई भुजबळ,ज्योती ज्ञानेश्वर टेके ,सोनू राजपूत, गौरव दौडे,सुनंदीलाल बोथरा, यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थापक अध्यक्ष काशिनाथ आगाज,उत्सव समिती अध्यक्ष संतोष बोथरा, धोंडीरामसिंह राजपूत,श्याम पवार,गणेश धुमाळ,बाळू पुणे,राजू पुणे,कुणाल जगताप, आदित्य चौधरी निशिकांत पवार,श्रीवास्तव हे सक्रिय सहभाग नोंदवीत आहेत.

# मुलीच्या वाढदिवसानिमित्त वृध्दाश्रमास किराणा वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** धनवे बाल रुग्णालय व सोनोग्राफी सेंटर येथील अश्रया क्लीनिकल लॅब चे संचालक महेंद्र विठ्ठल वानखेडे यांची मुलगी कु तन्वी हिच्या पाचव्या वाढदिवसा निमित्त तुकाराम आश्रय वृद्धश्रमास किराणा वाटप.

वाढदिवसानिमीत्त होणारा अनाठाई खर्च टाळत तसेच मुमहेंद्र विठ्ठल वानखेडे व सौ माधुरी महेंद्र वानखेडे कु. आयुषी महेंद्र वानखेडे कु. तन्वी महेंद्र वानखेडे हिच्या वाढदिवसा निमित्त

ऋणानुबंध समाज विकास संस्था चिखली व्दारा संचालीत तुकाराम आश्रय वृध्दाश्रम भोकर येथे निराधार बेघर बेसहारा वयोवृध्दांची निरंतर सेवा करण्यात येते. सामाजीक बांधिलकी जोपासत मुलीच्या वाढदिवशी एक महिन्याचा किराणा वाटप करुन मुलांसमोर आदर्श निर्माण केला आहे. यावेळी वृध्दांच्या चेहर्‍यावरी स्मीत हास्य बघण्यासारखे होते तर कु. तन्वी ही अवघ्या पाच वर्षाची असुन तीच्या चेहर्‍यावर अत्यंत समाधान वाटत होते तीच्या आई वडीलांनी वृध्दांसाठी किराणा वाटप करुन तीच्यासाठी नविन आदर्श जोपासला आहे. महेंद्र वानखडे आणि परीवाने केलेल्या या कार्याचे कौतुक चिखलीशहरासह भोकर पंचकृषीत होत आहे. त्यांनी भावनिक आवाहनसुध्दा केले आपल्या मुलामुलींच्या व परीजनांच्या वाढदिवसाला अनाठाई ईतरत्र खर्च न करता वृध्दाश्रमास दान देऊन पुण्य कमवावे असे प्रतीपादन केले.

यावेळी वृध्दाश्रमातील वृध्दांसह सौ नंदा गणेश डोंगरदिवे, कु. प्रियंका वानखडे, विनोद डोंगरदिवे, पंजाब डोंगरदिवे, समाधान डोंगरदिवे, कावेरी डोंगरदिवे हे उपस्थित होते. यावेळी तुकाराम आश्रय वृध्दाश्रमाचे संचालक प्रशांतभैया डोंगरदिवे व सौ रुपाली डोंगरदिवे यांनी वानखडे परीवारांचे आभार व्यक्त केले.




# 'अर्थनीती' या पुस्तकास राज्यस्तरीय 'शब्दसारथी' साहित्य गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** साहित्यिक सचिन कुसनाळे यांच्या 'अर्थनीती'



या पुस्तकास अखिल भारतीय शिक्षक साहित्य कला क्रीडा मंडळ,सांगली यांच्यावतीने राज्यस्तरीय शब्दसारथी उत्कृष्ट वैचारिक साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला.मंडळाचे जिल्हाध्यक्ष महेशकुमार कोष्टी यांनी ही घोषणा केली. साहित्यिक सचिन कुसनाळे यांनी अनेक वैचारिक ग्रंथांचे लेखन केले आहे.त्यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'स्वातंत्र्यायण' या स्वातंत्र्याच्या व्यवस्थापन विषयक ग्रंथांचे केलेले लेखन औचित्यपूर्ण ठरले आहे. त्याचे रेडिओवरून क्रमशः वाचनही चालू आहे. त्यांच्या 'विश्ववाद' या ग्रंथातून त्यांनी स्ववादातून विश्ववाद कसा साकारता येईल, यासंबंधी सैद्धांतिक मांडणी केलेली आहे. 'अर्थनीती' या पुस्तकातून अर्थकारणातील खरा अर्थ स्पष्ट करत आर्थिक मूल्ये व अर्थशास्त्राची मूलतत्त्वे विशद केली आहेत. कुसनाळे यांना यापूर्वीही अनेक उत्कृष्ट वैचारिक वाड्.मय पुरस्कार मिळाले आहेत.

# लोकअदालतीत 250 प्रकरणे निकाली

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार पंढरपूर तालुका विधी सेवा समितीच्या वतीने शनिवार दि. 11 फेब्रुवारी 2023 रोजी जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये 250 प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमध्ये 4 कोटी 12 लाख 29 हजार 869 रुपयांची तडजोड करण्यात आली. तसेच सुमारे 20 वर्ष 6 महिन्यांपासुन प्रलंबित असणारे दिवाणी अपील तडजोडीअंती निकाली निघाले असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. बी. लंबे यांनी दिली. जिल्हा व सत्र न्यायालय, पंढरपूर येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन तदर्थ जिल्हा न्यायाधीश बी. बी. तोष्णीवाल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. पॅनल क्रमांक 1 मध्ये सन 2002 मध्ये दाखल असलेले जमीनीच्या वादाचे अपील हे तडजोडीसाठी ठेवण्यात आले होते.

मौजे कासेगाव (ता.पंढरपूर) येथील जमीनीच्या वादाचे अपील होते. अपीलार्थी व उत्तरार्थी यांनी सदरचे अपील निकाली करणेसाठी तडजोडसाठी दाखल करुन आपआपले क्षेत्राची कायदेशिर फाळणी व मोजणी करुन घेण्यास संमती दर्शविल्याने सदरचे अपील तंडजोडीअंती निकाली निघाले आहे. लोकअदालतीसाठी एकुण 5 पॅनलची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये तदर्थ जिल्हा न्यायाधीश- बी. बी. तोष्णीवाल, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ए. ए. खंडाळे, दिवाणी न्यायाधीश एम. आर. कामत, दिवाणी न्यायाधीश श्रीमती टी. जी. बन्सोड तसेच दाखलपूर्व प्रकरणांच्या पॅनलमध्ये दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर. एम. आर. जाधव यांनी काम पाहिले. तत्पुर्वी राष्ट्रीय लोकअदातीचे उद्घाटन करुन नागरिकांमध्ये लोकअदालतीमध्ये लोकअदालतीचे असणारे महत्वाची माहिती देण्यात आली. सदर प्रसंगी पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष श्री. भगवान मुळे व श्री. एम. एम. नाईकनवरे उपाध्यक्ष हे उपस्थित होते.

सदर लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, महावितरणचे अधिकारी व पक्षकार मोठया संख्येने उपस्थित होते.



# संत सेवालाल महाराज जन्मोत्सवानिमित्त सेवा सप्ताह आयोजित करा : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील प्रत्येक तांड्यात व वस्तीवर सेवा सप्ताह आयोजन करा अशे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.जिल्ह्यातील पोहरादेवी येथे समाधीस्थ झालेले संत सेवालाल महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त प्रत्येक तांड्यात नादांतांडा, टिटवी,देव्हारी,चारुतांडा,घाणे गांव तांडा,देवळगाव गुजरी व सोयगाव तालुक्यात सेवा सप्ताहाचे आयोजन करण्याचे आवाहन माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले. पुरोगामी विचाराचे संत सेवालाल महाराज यांचा जन्म कर्नाटक राज्यात १५ फेब्रुवारी १७३९ रोजी झाला होता. आदिशक्ती देवी जगदंबेचे भक्त असलेल्या संत सेवालाल महाराज यांनी आपल्या हयातीत मानव कल्याण, निसर्गाचा आदर ठेवण्याची शिकवण महाराज यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त सप्ताह साजरा करण्याचे आवाहन केले. जन्मोत्सवानिमित्त आयोजित सप्ताहात यांचा भोग आणि अर्दास (प्रार्थना) करण्याचे प्रतिपादन बाबूसिंग महाराज यांनी संत सेवालाल महाराज यांचा जन्मोत्सव उत्साहात मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात यावा व सार्वजनिक सुटी जाहीर करण्याची मागणी केले. तसेच संत शिरोमणी सेवालाल महाराज जन्मोत्सव साजरा करता यावा यासाठी १५ फेब्रुवारी ही सुट्टी जाहीर करावे अशी मागणी बाबूसिंग महाराज यांनी मागणी शुद्धा केली आहे.

# उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हसनखेडा अतिक्रमणमुक्त

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :**नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त कार्यालयाने आदेशीत करूनही पन्नास वर्षांपासून गावनकाशात दाखवलेला गाडीरस्ता गावकऱ्यांना उपलब्ध होत नाही हे धक्कादायक असून जिल्हाधिकारी यांच्या हाताखालील कर्मचारीवर्गच न्यायिक आदेशाचे अनुपालन करीत नाही हे चिंताजनक आहे, असा संताप उच्च न्यायालयाने व्यक्त केल्यानंतर अखेर हसनखेडा, ता. कन्नड येथील ग्रामस्थ भगवान मनगटे व अन्य गावकऱ्यांच्या चार वर्षांच्या न्यायालयीन लढ्यास यश आले. दि 13 फेब्रुवारी 2023 रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन अतिक्रमणांमुळे कोंडलेला गाव रस्ता स्थानिक प्रशासनाने मोकळा केला.

याबाबत हकीगत अशी की, हसनखेडा, ता. कन्नड येथील गावकरी भगवान मनगटे व अन्य गावकर्‍यांनी गावामधून जाणारा जुना गाडीरस्ता वहीवाटीसाठी खुला व्हावा यासाठी नायब तहसिलदार यांच्या न्यायालयासमक्ष मामलतदार कायद्याखाली केस दाखल केली. त्यात प्रत्यक्ष स्थळपाहणी होऊन नायब तहसिलदार यांनी पंचनामा केला. गावरस्ता आढळून येत असलेबाबत नायब तहसिलदार यांनी सकारात्मक निवाडा दिला. यावर गावातील काही गावकर्‍यांनी नायब तहसिलदार यांच्या निर्णयास उप-जिल्हाधिकारी यांच्यासमक्ष अपीलात आव्हान दिले. उपजिल्हाधिकारी यांनी



अपील फेटाळले. त्यावर मूळ प्रतिवादी यांनी विभागीय आयुक्तांपुढे रिवीजन अपील दाखल केले. आयुक्तांनी रिवीजन अपीलही फेटाळले. नायब तहसिलदार यांच्या मूळ आदेशाची अंलबजावणी होऊन प्रत्यक्ष गावरस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात यावी अशा आशयाची अनेक निवेदने मनगटे यांनी तहसिलदार व जिल्हाधिकारी यांच्यापुढे सातत्याने सादर केली. तथापि, प्रशासनाने या निवेदनांची कोणतीच दखल घेतली नाही. ऊलट एक ताजा पंचनामा तयार करून रस्त्याच्या ठिकाणी उभी पीके असून काही ठिकाणी घरकुले उभारण्यात आली आहेत त्यामुळे रस्ता देण्यास आपण असमर्थ आहोत असा अहवाल तहसिलदार यांनी सादर केला. अखेर मनगटे यांनी ॲड चैतन्य धारूरकर यांच्यामार्फत उच्च न्यायालयात दाद मागितली. त्यावर सुनावणी होऊन न्यायालयाने जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष स्थळपाहणी करून जागेचा ताबा अर्जदार यांना देण्याची कारवाई करणेबाबत आदेशीत केले. तथापि, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी न्यायालयापुढे एक अहवाल सादर करून अर्जदार यांना तीन वैकल्पिक रस्ते उपलब्ध करून देता येतील असा अभिप्राय दिला. सदर अहवाल हा धक्कादायक असून न्यायालयाने पारीत केलेला मूळ आदेश हा रस्ता अतिक्रमणमुक्त करणेबाबत होता. त्याऐवजी जिल्हाधिकारी यांनी पर्यायी मार्ग सुचवणे हे आश्चर्यजनक आहे. प्रशासननाने याचिकाकर्त्यांना अपेक्षित रस्ता अतिक्रमणमुक्त करून देणे हिताचे आहे व तसा अहवाल न्यायालयापुढे सादर करावा असे आदेश न्या मंगेश पाटील व न्या संतोष चपळगावकर यांनी पारीत केले.

अखेर दि. 13 फेब्रुवारी 2023 रोजी न्यायालयीन आदेशावर कारवाई होऊन प्रशासनाच्या पथकाने हसनखेडा येथे भेट देऊन मनगटे यांच्या अर्जानुरूप गावरस्त्यावरील अतिक्रमणे हटवली.

# झाडांसोबत साजरा झाला 'व्हॅलेंटाईन'

## वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे 'माझं श्वास... माझं झाड' अभियानातून जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** वसुंधरा प्रतिष्ठान तर्फे लातूर येथील जुना औसा रोडवरील लाल बहादूर शास्त्री शाळेजवळ झाडांसोबत व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यात आला. यावेळी झाडांना फुगे बांधून निसर्गावर प्रेम करा असे आवाहन करण्यात आले. झाडे आहेत म्हणून माणूस जगू शकतो हा भाव व्यक्त करण्यासाठी वसुंधरा प्रतिष्ठानने हे अनोखे सेलिब्रेशन लातुरात केले. या माध्यमातून झाडांना जपायला हवे असे आवाहन करण्यात आले. मानव आणि निसर्ग यांच्यातील नाते दुरावत चालले आहे. वृक्षतोड करून मानवाने निसर्गाचा घात केला आहे. मानव आणि निसर्ग यांच्यातील नाते दृढ व्हावे यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान तर्फे निसर्गासोबत व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यात आला. 'माझं झाड, माझं व्हॅलेंटाईन' असा संदेश यातून देण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून निसर्ग संवर्धन काळाची गरज हा संदेश देण्यात आला. वसुंधरा प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेने नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. एक व्यक्ती:एक वृक्ष ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली पाहिजे. सर्वांना वृक्ष लागवड अन संवर्धनाचे महत्त्व लक्षात यावे याकरिता नाविन्यपूर्ण अन नवखे उपक्रम राबविले जातात. निसर्गावर प्रेम करावे असे आवाहन व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने करण्यात आले. या उपक्रमात वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा, कार्याध्यक्ष अमोल आप्पा स्वामी, सदस्य संजय माकुडे, शकुंतला मंडगे, आशा बोळेगावकर यांच्यासह मंडगे परिवारातील लहान मुले उपस्थित होती.



### मोफत ऑक्सिजन देणाऱ्या झाडांवर प्रेम करायला हवं :प्रा .योगेश शर्मा

निसर्ग आणि मानव यांच्यातील नाते आणखी दृढ व्हावे यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून जनजागृती करत असते . प्रत्येक सण, डे, उत्सव निसर्गाशी कसा जोडता येईल यासाठी प्रयत्न केला जातो . ज्या झाडांकडून मानव मोफत ऑक्सिजन घेतो, त्या झाडांना जपले पाहिजे, असे आवाहन वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा .योगेश शर्मा यांनी केले . झाडांची पूजन करणे ही आपली भारतीय संस्कृती आहे . दिवसेंदिवस झाडांची संख्या कमी होत चालल्याने ग्लोबल वॉर्मिंग, दुष्काळ, पाणी टंचाई आदी समस्यांना सामोरे जावे लागते आहे . त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने किमान एक तरी झाड लावून त्याचे संवर्धन केल्यास वनांचे क्षेत्र वाढण्यासाठी मोठी मदत होईल असेही ते म्हणाले .



# वडोद बाजार ते जातेगाव फाटा रस्त्याचे काम प्रगतीपथावर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोदबाजार ते जातेगाव फाटा हा ५ किमी रस्त्याचे रुंदीकरणासोबतच मजबुती करण होऊन रस्ता डांबरीकरणाने चकचकीत केला जात आहे. पुर्वी या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झालेली होती. माञ आता रस्ता डांबरीकरण होऊन गुळगुळीत होत असल्याने जनतेतून सार्वजनिक बांधकाम विभागाचे आभार व्यक्त केले जात आहे. सदरचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून यापुर्वीच प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत झाला आहे. रस्त्याचे मजबूती करणासह डांबरीकरणही झाले होते. परंतु अवजड वाहतुक व पावसाळ्यात अनेक ठिकाणी कुठे पाणी साचून तर कुठे पाणी वाहल्याने रस्ता खचला होता. त्यामुळे रस्त्यावर पुन्हा खड्डे पडल्याने रहदारीस वारंवार अडथळे निर्माण होत होते. माञ आमदार हरिभाऊ बागडे यांनी याकडे लक्ष घालून रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिल्याने रस्त्याची नव्याने दुरुस्ती केली जात आहे. नागरिकांना जातेगाव फाटा मार्गे पाल फाट्यावरुन औरंगाबाद जळगाव राष्ट्रीय महामार्गाने औरंगाबादला जाण्यासाठी हा सोयीचा व जवळचा मार्ग आहे. परंतु रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना दुसरा मार्ग अवलंबवा लागत होता.

शिवाय इतर ठिकाणहून वडोदबाजार येथील आठवडी बाजारला येणार्या नागरिकांसाठीही हा सोयीचा रस्ता आहे. दरम्यान, सद्या ३ मिटरची डांबरी धावपट्टी असलेला हा रस्ता नव्याने ५.५० मिटर डांबरी धावपट्टीचा होत आहे. केंद्रीय मार्ग निधीतून या रस्त्याचे काम होत असल्याने काम चांगल्या गुणवत्तेचे व्हावे म्हणून फुलंब्री सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता आर.टी.हेलाले यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा अभियंता एस.एम.जाधव हे कामावर तळ ठोकून ठेकेदाराकडून व्यवस्थित काम करवून घेत आहेत. निधी उपलब्ध करून दिला त्याबद्दल आमदार हरिभाऊ बागडे नाना व सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनीयर यांचे जनतेतून खूप खूप आभार व्यक्त करण्यात येत आहे.



# अपघातात मृत्यू पावलेल्या तरुणाच्या कुटुंबीयांनाआर्थिक सहाय्य

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** भोकरदन तालुक्यातील थिगळखेडा येथील तरुण जनार्धन अण्णासाहेब ढवळे( २५ ) ह्या तरुणाचा जुलै 2022 च्या रात्री जालन्याहून राजूरकडे येत असताना तुपेवाडी फाट्याजवळ दुचाकी अपघातात डोक्याला मार लागून उपचारा दरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला होता. घरातील कर्ता आणि तरुण मुलगा अचानक सोडून गेल्याने जनार्धन ढवळेच्या आई-वडिलांना फार मोठा धक्का बसला होता.

परंतु जनार्धन ढवळे यांनी आपल्या व्यवसायातील बचतीतून व भविष्यातील दुरदृष्टिकोणातून राजूर अर्बन बँकेमध्ये अपघात विमा काढलेला होता.आज कै. जनार्धन ढवळेच्या वारस म्हणून त्यांच्या आई सौ. सुमणबाई व वडील श्री.आण्णासाहेब ढवळे यांच्याकडे राजूर अर्बन बँकने एक लाख आठ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी राजूर अर्बन संस्थापक- कैलास गबाळे,अध्यक्ष भीमाशंकरदारुवाले, व्यवस्थापक संग्राम पाटील,पांडुरंग इंगळे, संदीप मगरे यांसह बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# तर त्यांना तिथेच झोडा; आ. यशोमती ठाकूर

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापण्यासाठी कुणी अधिकारी आले तर त्यांना तिथेच झोडा, अशा शब्दांत काँग्रेसच्या आमदार यशोमती ठाकूर यांनी आपला संताप व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांच्या विजेला हात लावू नका, असा सज्जड दमही त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिला आहे. यशोमती ठाकूर यांनी अमरावती जिल्ह्यातील तिवसा येथील पाणीटंचाइचा आढावा घेतला. यावेळी परिसरातील काही शेतकऱ्यांनी वीज पुरवठा खंडित केल्याबाबतची तक्रार त्यांच्याकडे केली. शेतकऱ्यांची तक्रार ऐकल्यानंतर यशोमती ठाकूर यांनी भर बैठकीत अधिकाऱ्यांना चांगलेच सुनावले. गेली दोन वर्षे करोना होता, लोकांनी काय आत्महत्या करायची का, तुम्ही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कसे काय कापत आहात, असा सवाल त्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना विचारला. शेतकऱ्यांचा वीज पुरवठा खंडित करू नका, हे निर्दयी सरकार आहे, असे म्हणत त्यांनी राज्य सरकारवरदेखील टीका केली. अधिकारी वीज कनेक्शन कापण्यासाठी शेतात आले तर त्यांना तिथेच झोडा, असा अजब सल्लाही त्यांनी शेतकऱ्यांना दिला. महावितरण कंपनीने शेतकऱ्यांकडून वीजबिल वसुली करण्याचे काम मागील काही दिवसांपासून हाती घेतले आहे.

# वैजापूरात संत श्रेष्ठ श्री गजानन महाराज यांचा१४५वा प्रकट दिन उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** माघ कृ, सप्तमी सोमवार( ता,१३ )रोजी शेगाव निवासी संत श्री गजानन महाराज यांचा १४५वा प्रकट दिन विविधकार्यक्रमानी सुंदर गणपती मंदिर मित्र परिवार व प्रकट दिन उत्सव मंडळ च्या वतीने गजानन महाराज ग्रंथ व प्रतिमा मिरवणूक, श्री विजय ग्रंथ चरित्र पारायण, प्रवचन व कल्याच्या किर्तनाने संपन्न झाला, प्रकट दिनी भव्य प्रतिमा मिरवणूक काढण्यात आली व जालना येथील भागवताचार्य हभप श्री हरी वैष्णव महाराज यांच्या काल्याच्या कीर्तन व महाप्रसादाचे सांगता झाली. या त्रिदिवशीय कार्यक्रमात तीनशे परायनार्थी नी पारायण केले,संस्थापक अध्यक्ष काशिनाथ आगाज व उत्सव समिती अध्यक्ष संतोष बोथरा, श्रावण चौधरी, अजय भुजबळ व ठा, धोंडीरामसिंह राजपूत यांनी या त्रिदिवशीय कार्यक्रमाचे आयोजन करून अत्यंत नियोजन पद्धतीने गजानन महाराज प्रकट दिन उत्साहात संपन्न केला. या प्रसंगी आ.रमेश पा.बोरणारे, उपनागराध्यक्ष साबेरखान, नगरसेवक शैलेश चव्हाण, गणेश खैरे, ज्ञानेश्वर टेके, ज्योती टेके, गणेश धुमाळ,राजू पुणे,श्याम पवार,गणेश अनर्थे, अण्णा अधिकार, शशिकांत पवार, निलेश,लाडवाणी, कुणाल जगताप, बाळू पुणे, अमोल निखाडे, मंगल जगताप, सोनी अपशिंदे, सौ.सोनदे, बेबी आगाज, आदित्य वडनेरे,गोटू बिडवे, नीता वडनेरे, रत्नमाला आसर, विलास रामैय्या यांनी सहभाग नोंदवीला.

# भीमराव परघरमोल यांचे चंद्रपूर येथे व्याख्यान संपन्न

आधुनिक केसरी न्यूज



**तेल्हारा :** बुद्धाचा धम्म हा विज्ञानवादी आणि लोककल्याणकारी आहे असे प्रतिपादन भिमराव परघरमोल यांनी चंद्रपूर येथील धम्म परिषदेमध्ये केले. सविस्तर वृत्त असे की, म. फुले तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संवर्धन समिती चंद्रपूर यांनी वधू-वर परिचय मेळावा व धम्म परिषदेचे आयोजन केले होते. धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी विजय उंबरे (समिती अध्यक्ष तथा माझी कार्यकारी अभियंता महावितरण) हे होते, उद्घाटक डॉ. इसादास भडके (लेखक तथा सामाजिक कार्यकर्ता चंद्रपूर) मुख्य मार्गदर्शक म्हणून भिमराव परघमोल (लेखक, व्याख्याता, तथा अभ्यासक फुले शाहू आंबेडकरी विचारधारा तेल्हारा जिल्हा अकोला) व प्रा. नैनता टिपले नागपूर यांच्यासह अविनाश टिपले व राजूभाऊ खोब्रागडे यांची विचार पीठवारवर उपस्थित होती.

भिमराव परघरमोल हे आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले की, अडीच हजार वर्षांपूर्वी बुद्धांनी प्रतिपादन केलेली लोककल्याणाची तत्वे आजही समाजाला जशीच्या तशी लागू पडतात कारण ती विज्ञानवादी आहेत. तसेच माझी आणि माझ्या धम्माचीही चिकित्सा करून जे कालबाह्य तत्व असतील ते काढून टाकण्याचे स्वातंत्र्य बुद्धाप्रमाणे जगातील कोणत्याही धर्म संस्थापकाने दिले नाही असे ते म्हणाले.

प्रा. नैनता टिपले, अविनाश टिपले यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक दिलीप वावरे (समिती सचिव) यांनी केले तर सूत्रसंचालन अशोक देवगडे कार्याध्यक्ष, यांनी करून उपस्थितांचे आभार तुकाराम देशपांडे यांनी मानले.

कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून तरुण-तरुणींसह पालकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



# उच्चशिक्षण क्षेत्रातील प्रश्नांवर ‘काळ्या फिती’ लावून आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ व ‘महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ’ यांच्या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देत उच्च शिक्षण क्षेत्राच्या व प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी दि. १४ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयीन प्राध्यापकांनी ‘काळ्या फिती’ लावून आंदोलनात सक्रीय सहभाग नोंदविला. सदरील आंदोलनाच्या मागणी पत्रात उच्च शिक्षण क्षेत्रासाठीची आर्थिक तरतूद वाढवण्यात यावी; शिक्षणाचे खाजगीकरण थांबवावे, नवीन शैक्षणिक धोरण रद्द करावे, जुनी पेंशन योजना लागू करणे, युजीसी रेगुलेशन २०१८ ची काटेकोर अंमलबजावणी करणे, पीएच. डी. व एम फिल वेतनवाढी पुर्ववत करणे; उद्‌बोधन वर्ग व उजळणी वर्गाकरिता दि. ३१.१२.२०२२ पर्यंत मुदतवाढ देणे; प्राध्यापकांची रिक्त पदे तात्काळ भरणे; सहयोगी प्राध्यापक पदी पदोन्नती साठीची पीएच. डी. ची अट रद्द करणे, युजीसी प्रादेशिक कार्यालये बंद करण्याचा निर्णय रद्द करणे, आरक्षण धोरणाचे पालन व्हावे आदि मागण्यांचा समावेश आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत प्राध्यापक महासंघ संलग्नित ‘बामुक्टो’ प्राध्यापक संघटनेच्या वतीने विद्यापीठ परिक्षेत्रातील औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्यने उत्स्फुर्तपणे सहभागी झाले अशी माहिती 'बामुक्टो' संघटनेचे डॉ मारोती तेगमपुरे यांनी दिली. आंदोलन यशस्वी करण्यासाठी बामुक्टोचे अध्यक्ष डॉ. बाप्पासाहेब मस्के, सचिव डॉ. विक्रम खिल्लारे, डॉ. दिलीप बिरुटे, डॉ. उमाकांत राठोड, डॉ. संजय कांबळे, ज्ञानेश्वर वैद्य, डॉ. मदन शिंदे, डॉ. शफी शेख यांनी प्रयत्न केले.



# जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत गोंडपिपरी तालुका अव्वल

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपिपरी :** ९ फ्रेबूवारी ते ११ फेब्रुवारी २०२३ ला जिल्हा स्टेडियम, चंद्रपूर येथे जिल्हा अधिकारी, कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा पार पडल्या.यामध्ये गोंडपिपरी तालुक्याने पुरुष विभागात खो खो, फूटबॉल या स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर महिला विभागातून फुटबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. तसेच सांस्कृतिक स्पर्धेत वैयक्तिक नृत्य महिला व पुरुष गट प्रथम क्रमांक, वैयत्तिक नक्कल पुरुष प्रथम क्रमांक, समुहगायन महिला प्रथम क्रमांक तर समुहगायन पुरुष द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच वैयतिक स्पर्धेत बॅटमिंटन मध्ये एकेरी महिला पुरुष द्वितीय तर दुहेरी पुरुष मध्ये द्वितीय क्रमांक मिळाला.जलतरंग महिला द्वितीय,१५०० मीटर महिला प्रथम,लांब उडी महिला प्रथम अशा विविध स्पर्धेत प्रावीण्य मिळविले. मैदानी चॅम्पियन द्वितीय क्रमांक, सांस्कृतिक स्पर्धेत द्वितीय क्रमांक,तर सर्व स्पर्धेची जनरल चॅमपियनशिप गोंडपिपरी तालुक्याला मिळवून २०२३चा सर्वोत्कृष्ट तालुका ठरला. बल्ले बल्ले गोंडपिपरी या नाऱ्याने पूर्ण प्रियदर्शनी इंदिरा गांधी हॉल हादरून गेला. सर्व विजेत्या स्पर्धकांना मान.विवेक जॉनसन मुख्य कार्यकारी अधिकारी,शिक्षणाधिकारी दिपेंद्र लोखंडे,कल्पना चव्हाण तसेच इतर मान्यवर कडून बक्षिसे देण्यात आली. सर्व विजेत्या स्पर्धकांना मान. शालिक माऊलीकर गटविकास अधिकारी, मान. समाधान भसारकर गटशिक्षणधिकारी गोंडपिपरी तालुक्यातील विलास रोहणकर, प्रेमकुमार चकीनाला, पत्रूजी डोके, इंद्रपाल मडावी, दुशांत निमकर, भाऊराव बोरकुटे केंद्रप्रमुख यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# पवन चंद्रकांत खैरे स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज




**संदीप मानकर**

**औरंगाबाद :** जटवाडा रोडवर असलेल्या पवन चंद्रकांत खैरे इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन औरंगाबाद शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात अतिशय उत्साहात संपन्न झाले. माजी खासदार तथा शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, व शहराचे माजी उपमहापौर नंदकुमार घोडले यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी चांगल्या पद्धतीने ज्ञान आत्मसात करुन आपल्या आई-वडिलांचे व गुरु-जनांचे नाव रोशन करावे असे प्रतिपादन माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आपल्या भाषणांत बोलतांना केले. तर सर्वच वर्गातील चिमुकल्यांनी व विद्यार्थ्यांनी डान्सच्या माध्यमातून अत्यंत अप्रतिम कला सादर करुन उपस्थित पालकांची मने जिंकली. याप्रसंगी स्कुलचे श्री. उगले सर, प्राचार्य भगवान थोरात सर, सचिव अहिलाजी साबळे सर, श्रीमती आरती थोरात, श्रीमती कुलकर्णी, सौ.वैशाली मॅडम, सौ.जोशी मॅडम, उजमा मॅडम, सौ.शर्मा मॅडम, सौ.खडसे मॅडम, सौ.स्वाती मॅडम, सौ.गायकवाड मॅडम, सौ.आश्विनी मॅडम, सौ.पगारे मॅडम, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप मानकर, सतीश जाधव आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी सर्वच शिक्षक वृंदानी विशेष मेहनत घेतली.

# श्री संत गजानन महाराज प्रगटदिन मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** शहरातील नगरेश्वर मंदिर व गुरुकुल आश्रम येथील श्री संत गजानन महाराज मंदिर येथे 145 वा प्रगट दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. प्रगट दिवसानिमित्त आचार्य महेश महाराज यांच्या मार्गशनाखाली श्री ह.भ.प.माऊली महाराज मुडेकर यांचे कीर्तन ठेवण्यात आले. गण गण गणात बोते म्हणत पुष्प उधळत प्रगट दिवस साजरा करण्यात आला. शहरातून पालखी काढून गुरुकुल मंदिर येथे आणली. त्या वेळी महराजाचे के.डी. वटाने यांनी ह.भ.प.माऊली महाराज मुडेकर, आचार्य महेश महाराज,यांनी त्यांचे स्वागत केले. उपस्थित प्रमोद कराड, प्रताप देशमुख, तुकाराम अंभोरे, सह मोठ्या संख्यने महिला, पुरुष व वारकरी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद